सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २८९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# १ एप्रिलपासून जनगणना २०२७ चा पहिला टप्प्यास होणार सुरुवात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील बहुप्रतीक्षित 'जनगणना २०२७' च्या पहिल्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून १ एप्रिलपासून या मोहिमेला अधिकृतरीत्या सुरुवात होणार आहे. या पहिल्या टप्प्यात 'घरयादी' आणि 'गृहगणना' केली जाणार असून, यासाठी सरकारने ३३ प्रश्नांची यादी अधिसूचित केली आहे. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या दरम्यान आपल्या सोयीनुसार ३० दिवसांचा कालावधी निवडून ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

या मोहिमेअंतर्गत नियुक्त केलेले प्रगणक घराघरांत जाऊन घराची मालकी, घराचा वापर आणि घराच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य (छप्पर, मजला इ.) याबद्दल माहिती घेतील. तसेच कुटुंबातील व्यक्तींची




संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग आणि प्रमुखाची जात (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर) याविषयीचे प्रश्न विचारले जातील.

घरामध्ये पिण्याच्या पाण्याचा स्रोत काय आहे, विजेची व्यवस्था, सांडपाणी निचरा, शौचालयाची उपलब्धता आणि स्वयंपाकासाठी एलपीजी किंवा पीएनजी जोडणी आहे का, याचीही नोंद केली जाणार आहे.

आधुनिक जीवनशैलीचा आढावा घेण्यासाठी यावेळी नागरिकांकडील इलेक्ट्रॉनिक साधनांचीही माहिती घेतली जाईल. यामध्ये रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट सुविधा, लॅपटॉप, संगणक, टेलिफोन आणि स्मार्टफोन यांचा समावेश आहे. त्यासोबतच कुटुंबाकडे कोणते वाहन आहे आणि आहारात कोणत्या मुख्य धान्याचा वापर होतो, हे देखील प्रगणक विचारतील.

जनगणनेच्या पुढील संवादासाठी नागरिकांचा मोबाईल क्रमांकही नोंदवला जाईल. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष प्रगणक घरी येण्यापूर्वी १५ दिवस नागरिकांना 'स्व-गणना' करण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील ही गृहगणना सप्टेंबरपर्यंत पूर्ण झाल्यानंतर, फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या गणनेचा दुसरा टप्पा राबवला जाणार आहे.

## मैत्रिणीनेच केला मैत्रिणीचा विश्वासघात

**तभा वृतसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :, दि. २४ जानेवारी-** शहरातील सिडको एन-८ परिसरात एक अत्यंत संतापजनक आणि लज्जास्पद प्रकार उघडकीस आला आहे. ज्या मैत्रिणीसोबत एकाच रूममध्ये राहून सुख-दु:ख शेअर केली तिनेच विश्र्वासघाताची सीमा ओलांडली आहे. हॉस्टेलवर राहणाऱ्या एका तरुणीनं आपल्या रूममेटचे कपडे बदलतानाचे गुपचूप व्हिडिओ आणि फोटो काढून ते आपल्या एका प्रियकराला पाठवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

स्वराज धालगडे असं प्रियकराचे नाव आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील पीडित तरुणी आणि आरोपी या एम.जी.एम हॉस्टेलमध्ये रूममेट म्हणून एकत्र राहत होत्या. १८ जानेवारी रोजी, पीडित तरुणी कपडे बदलत असताना आरोपी मैत्रीनीने संधी साधून आपल्या मोबाईलमध्ये तिचे खासगी फोटो आणि व्हिडिओ टिपले. हे व्हिडिओ तिने तात्काळ तिचा प्रियकर स्वराज धालगडे याला पाठवून दिले.

## हिंद-दी-चादर समागमात श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी भाविकांच्या गर्दीचा महासागर



**तभा वृतसेवा**

**नांदेड, दि. २४ जानेवारी-** हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात आज राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, पोहरादेवीचे, महंत, सुनील महाराज,बाबुसिंग महाराज, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोड यांच्यासह हजारो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. सर्व जिल्ह्यातून व नांदेड शहरातून आलेल्या हजारो भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत.

भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश पोहोचत आहे.

## पुणे-नागपूर दरम्यान अनेक एक्सप्रेस रद्द

**तभा वृतसेवा**

**नागपूर, दि. २४ जानेवारी-** नागपूर- पुणे आणि नागपूरकरांना दोन दिवस त्रास सहन करावा लागणार आहे. शनिवार आणि रविवार रेल्वेविभागात सुरू असलेल्या कामांमुळे काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. दौंड-काष्टी रेल्वे विभागात सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामांसह आवश्यक अभियांत्रिकी व ओव्हरहेड इक्विपमेंट (ओएचई) संबंधित कामांसाठी रेल्वे प्रशासनाने वाहतूक ब्लॉक घेतला आहे. यामुळे चार रेल्वे रद्द केल्या गेल्या आहेत.

नागपूर-पुणे आणि पुणे-अजनी मार्गावरील काही महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्या तात्पुरत्या स्वरूपात रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पुणे आणि नागपूरातील प्रवाशांना या वीकेंडला काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. त्यात २६ जानेवारी सोमवारी आल्यामुळे लॉन्ग वीकेंडला अनेक नागरिक फिरायला जाण्याचा प्लॅन करतात. पण नेमकं वीकेंडलाच गाड्या रद्द केल्यामुळे प्रवाशांचा खोळंबा होणार आहे.

## दिल्लीत थंडी पुन्हा परतली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात शुक्रवारी सकाळपासून अवकाळी पावसाने जोर धरला आणि थंडी पुन्हा परतली. गुरुवारी रात्री उशिरापासून वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांच्या जोडीला शुक्रवारी सकाळपासून दिल्ली, नोएडा, गाझियाबाद आणि आसपासच्या भागांत आधी रिमझिम व नंतर मुसळधार पाऊस सुरू झाला. रात्री उशिरापर्यंत पाऊस कायम होता. यामुळे दिवसाही सूर्यदर्शन दुरापास्त झाले व दिवसभर अंधाराचे साम्राज्य राहिले. बुधवार व गुरुवार हे दिल्लीत सर्वांत उष्ण दिवस राहिले. दिवसा कमाल तापमान २७.१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले होते. मात्र, उत्तराखंड व हिमाचल प्रदेशात सिमला, मनालीसह अनेक ठिकाणी शुक्रवारी पहाटे हंगामातील पहिली बर्फवृष्टी झाली, याचा थेट परिणाम दिल्लीवर झाला. त्यात पावसाने भर पाडली व हुडहुडी भरवणाऱ्या थंडीमुळे दिल्लीकरांना पुन्हा स्वेटर-कोट-कानटोप्या-मफलरचा आधार घेणे भाग पडले. आज रविवारीही कमाल तापमान १७ अंश सेल्सिअस, किमान २० अंशावर राहण्याची शक्यता आहे.







# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ जानेवारी :** जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने, शाळा, महाविद्यालयांत मतदार जनजागृती करण्यानिमित्त वेळापत्रक जाहीर केले आहे. १९ जानेवारीपासून वेळापत्रकानुसार अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती लातूर पं. स.चे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी दिली.

दि. १९ ते २३ जानेवारी दरम्यान, शाळांचे केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, विस्तार अधिकाऱ्यांची बैठक, शाळांमध्ये निबंध, चित्रकला स्पर्धा, जनजागृतीविषयक कार्यक्रम, बीएलओंची आढावा बैठक, असे कार्यक्रम पार पडले. दि. २४ जानेवारी रोजी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी शाळा परिसरातील मुख्य चौक व गर्दीच्या ठिकाणी मतदान जनजागृती विषयक पथनाट्य, सर्व शाळांत मतदार जनजागृतीसाठी पालक मेळा- वा घेण्यात आला. दि. २६ जानेवारीला प्रभातफेरीद्वारे जनजागृती करणे, घोषवाक्य देणे हे कार्यक्रम होणार आहेत. तर दि. २७, २८ जानेवारी रोजी सर्व शाळांत वक्तृत्व - घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि. २९ जानेवारीला सर्व शाळांत पत्रिका वाटप, दि. ३० जानेवारी रोजी मतदार संकल्प पत्र आई-वडिलांकडून घेणे, दि. ३१ जानेवारीला स्काऊट गाईड रॅली कार्यक्रम, मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूर येथे होईल. दि. २ फेब्रुवारी रोजी मतदार जनजागृती विषयक सायकल रॅली मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूरसह इतर ठिकाणी काढण्याच्या सूचना लातूरचे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षकांना दिल्या आहेत. ही जनजागृती मोहीम ३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.



# मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीकडे लातूरवासियांचे लक्ष लागले असून कोणत्या नगरसेवकाच्या खांद्यावर कोणती जबाबदारी सोपविली जाऊ शकते,याबद्दल सामान्य नागरिकांत प्रचंड उत्सुकता आहे. मनपा निवडणुकीत काँग्रेस - वंचित आघाडीला लातुरात स्पष्ट बहुमत मिळाल्याने नागरिकांच्या नजारा आता आ. अमित देशमुख यांच्या निर्णयाकडे लागल्या आहेत.




मनपाचे महापौर पद अनुसूचित जातीच्या महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने आता त्या पदाबद्दलची उत्सुकता संपली आहे. तरीही महापौर कोणाला विराजमान केले जाणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मनपात पहिल्यांदा प्रवेश करणाऱ्या नगरसेविकेवर आ. अमित देशमुख एवढी मोठी जबाबदारी सोपविणार नाहीत, असा अनेकांचा होरा आहे. त्यामुळे दुसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या अजनीकर यांच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडण्याची शक्यता अधिक दिसून येत असल्याचे बोलले जात आहे. या एकाच पदाबद्दल नागरिकात चर्चा नसून त्यासोबतच उपमहापौर, विविध विषय समित्यांचे सभापतीपदांवर कोणाची वर्णी लागणार ? याकडेही सामान्य लातूरवासियांचे लक्ष लागले आहे. राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार असताना लातूरच्या मतदारांनी काँग्रेसला स्पष्ट बहुमत दिले आहे. लातूर शहराच्या विविध विकास कामांसाठी भविष्यात लागणाऱ्या शेकडो कोटींच्या निधीसाठी आ.अमित देशमुख यांना त्यांच्या राजकीय नातेसंबंधांचा अतिशय चौकसपणे वापर करावा लागणार आहे. आ. देशमुख आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संबंध जवळीकतेचे असल्यामुळे लातूरच्या विकास कामांना निधीची कमतरता भासणार नाही, असाही अंदाज लावला जात आहे. आता निवडणुका संपल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री सुद्धा विकास कामांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना उपलब्ध करून देतील,असा विश्वासही नागरिकांना वाटत आहे.

या महिना अखेरीस महापौर पदाच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर होईल. त्यानंतर उपमहापौर आणि विविध विषय समित्यांच्या सभापतींच्या निवडीचा कार्यक्रम लागेल. शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्यासाठी पदाला न्याय देण्यास सक्षम असणाऱ्या चेहऱ्याच्या निवडी करण्यास आ. देशमुख प्राथमिकता देणार असल्याची चर्चा काँग्रेसच्या वर्तुळात चालू आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून घेताना खऱ्या अर्थाने आ. अमित देशमुखांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. त्यांनीही राजकारणातील अनेक चढ उतार अनुभवले - पाहिले असल्याने यासंदर्भात ते उचित निर्णय घेतील असा अनेकांना विश्वास आहे.

मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीमध्येही आ. देशमुख अनुभवी चेहऱ्यांना प्राधान्य देतील, अशी चर्चा काँग्रेस आणि मनपा वर्तुळात चालू आहे. मावळत्या पालिका पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत अधिक चांगले काम करण्यासाठी आपल्या नगरसेवकांना आ. देशमुख योग्य ते निर्देश देणार आहेत, हे कोणालाही वेगळ्या शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. शहराच्या कोणत्या प्रभागातील कोणत्या नगरसेवकांवर विषय समितीची जबाबदारी सोपविली जाईल याकडेही लातूरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

# लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त आज बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधत यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु होणार असून या महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असेआवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे.

महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन होत असून याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून ७३ वा यात्रा महोत्सव सुरु होणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व कर्नाटक राज्यातील



नागरिक व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. हा यात्रा महोत्सव शांततेत पार पडावा यासाठी प्रतिवर्षी विविध समित्या गठीत करण्यात येतात. सदर यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान येथे बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व शहर परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची समाज जागृतीसाठी गरज : ॲड. पगार गवांदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरीतींच्या विरोधात विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या ॲड. रंजना पगार गावंदे यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेच्या समारोप व तिसऱ्या पुष्पाच्या प्रसंगी समाज वास्तवाला भिडताना या विषयावर विचार मांडत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते. तर विचारमंचावर सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना ॲड. पगार गवांदे म्हणाल्या की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आयोगातही समाजामध्ये कर्मकांड मोठ्या प्रमाणात पसरवले जात आहेत. चेटूक, डाकिन, अघोरी उपाय करणारे भोंदू बाबा, मांत्रिक, तांत्रिक यांनी समाज नासवला आहे. तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा आणि महाराष्ट्रातील संत सुधारकांनी या सर्व वाईट चालीरीती, रूढी परंपरा यांच्या विरुद्ध परखड शब्दांत ताशेरे ओढले आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजाचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत स्त्री भ्रूणहत्या मुलींची कौमार्य चाचणी, चारित्र्य परीक्षा, देवदासी आणि बालविवाह प्रथा देखील विज्ञाननिष्ठ समाजाने उखडून फेकल्या पाहिजेत. जातपंचायतीमध्ये अडकलेल्या कुटुंबांना या जोखडातून मुक्त केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवण्णा हे क्रांतिकारी समाज सुधारक होते त्यांच्या आंतरराष्ट्रीय कल्पना केवळ संघटित कार्याद्वारेच मूर्त होऊ शकते ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी शरण यांना एकत्र करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली. आजच्या लोकशाही शासन व्यवहारात देखील महात्मा बसवन्नाचे विचार तत्त्वज्ञान कार्य समाज उन्नती करिता मोलाचे आहेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, पाहुण्याचा परिचय डॉ. अश्र्विनी रोडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले आणि आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले.

# प्रशासक काळ संपूनही मनपाची अनागोंदी थांबेना

**माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची मनपा आयुक्तांकडे मागणी**



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका नुकत्याच पार पडल्या असून महापौर, उपमहापौर निवडी बाबत राज्य शासनाने कार्यक्रम जाहीर केलेला आहे. अशा परिस्थितीत व्यक्ती विशेष यांचे हित जोपासत नियम धाब्यावर बसवीत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची घाई मनपा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. याबाबत माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी मनपा आयुक्तांकडे पारदर्शकता पाळण्याची विनंती केली आहे.

मागील ३ वर्षापेक्षा अधिक काळ लातूर महानगरपालिकेत प्रशासक राज्य होते. याकाळात झालेला अनागोंदी कारभार लातूरकरांनी अनुभवला आहे. आता निवडणूक संपन्न झाल्या तरी यात बदल होताना दिसून येत नाही. नूतन कार्यमंडळ अस्तित्वात आले असूनही सर्व साधारण सभा तथा स्थायी समिती यांच्या मंजुरी न घेता राबविण्यात येत असलेली प्रक्रिया कायदेशीर नसल्यानं यावर स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# विवेक सौताडेकर यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्या शाखा अंतर्गत लातूरचे साहित्यिक व इतिहास संशोधक विवेक सयाजीराव सौताडेकर यांनी हिंदी और मराठी उपन्यासों में छत्रपती शिवाजी : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर संशोधन पूर्ण करुन प्रबंध सादर केला.त्यामुळे विद्यापीठामार्फत अनेक तज्ज्ञांच्या उपस्थितीमध्ये त्यांची मौखिक परिक्षा घेऊन स्वा. रा.ती.म.विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक म्हणून किल्लारी येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. हणमंत पवार यांनी काम पाहिले.



मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मार्फत प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. अपर्णा पाटील,मौखिक परिक्षेच्या अध्यक्षस्थानी स्वा.रा.ती.म.नांदेड येथील भाषा विभागाचे संचालक डॉ.दिलीप चव्हाण, मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. हणमंत पवार तसेच माजी अधिष्ठता प्राचार्य डॉ .नागोराव कुंभार, डॉ .रणजीत जाधव,प्राचार्य डॉ.संग्राम मोरे, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ.गणपतराव माने, डॉ.देवकांत गुरव, डॉ.ज्ञानेश्र्वर देशमुख, डॉ. रामभाऊ मुटकुळे, डॉ.नयन राजेमाने ,प्रा.जयश्री भताने,आदी मान्यवर उपस्थित होते.

# केशवराजमध्ये बोस-ठाकरे जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंचावर प्रमुख वक्ते विद्यालयातील इतिहास विषयाचे तज्ञ शिक्षक प्रल्हाद माले, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रल्हाद माले यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपणारे, महाराष्ट्रातील लोकांची वैचारिक जडणघडण करणारे, शिवसेना या राजकीय पक्षाचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम प्रमुख प्रयागराज गरुड यांनी केले. याप्रसंगी आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २६ जानेवारी रोजी बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच मंगळवार, २७ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त : डॉ. आनंद रेड्डी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून तणाव, चिंता व नैराश्य यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत संतुलित जीवनशैली अंगीकारणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ तथा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षक डॉ. आनंद रेड्डी यांनी केले.



एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने कृत्रिम दंत रोपण दिनानिमित्त आयोजित 'मानसिक आरोग्य व ताण व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात डॉ. आनंद रेड्डी बोलत होते. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. सुषेन गांजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. आनंद रेड्डी म्हणाले की, नियमित व्यायाम, योग व ध्यान यामुळे मन शांत राहते. दररोज किमान सात ते आठ तासांची पुरेशी झोप, संतुलित आहार, पाण्याचे योग्य सेवन, छंद जोपासणे, संगीत ऐकणे तसेच आवडत्या व्यक्तींसोबत वेळ घालवणे हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. वेळेचे योग्य नियोजन, काम व वैयक्तिक आयुष्यात समतोल राखणे आणि सोशल मीडियापासून वेळोवेळी विश्रांती घेणे ही संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यास पोषक ठरते.सूत्रसंचालन डॉ. समर्थ रेवडकर, डॉ. वेदिका देशमुख, डॉ. श्रेयस मगर यांनी केले तर आभार डॉ. सुषेन गांजरे यांनी मानले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रविण मरुरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. अमोल बडगीरे, व डॉ. शितल वाघ, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. प्रणोती चिंचनसुरे, डॉ. शारदा झाडके, डॉ. प्रतिक्षा सोमवंशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.डी.एस. व एम.डी.एस. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपातर्फे पानगावातून सतीश आंबेकर यांची उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातून वाडीवस्तीतून ऋषिकेशदादा कराड यांच्या नावाला पसंती होती मात्र पक्षाच्या निर्णयानुसार त्यांना उमेदवारी देणे शक्य नसल्याने भाजपाच्या वतीने सतीश आंबेकर हे अधिकृत उमेदवार असतील तेंव्हा सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून बहूमताने विजयी करावे आणि पानगाव हा लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखववावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.




पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झाली याप्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आमदार आणि खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली जाणार नाही असा निर्णय भाजपाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत झाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या निर्णयामुळे पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी गावागावातून वाडी वस्तीतून अनेकांनी मोठ्या प्रमाणात केली होती. पक्षाच्या निर्णयानुसार आणि आदेशान्वये ऋषिकेश कराड यांची उमेदवारी मागे घेण्यात येत असून सतीश आंबेकर यांना भाजपाचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले.

आमदार खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी नाही हा पक्षाचा निर्णय रमेशआप्पा कराड यांच्या पर्यंत मर्यादित नसून राज्यातील जवळपास चाळीस जागेसाठी बंधनकारक आहे. याबाबतीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि निवडणूक प्रमुख चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्यासोबत माझी चर्चा झाली असल्याचे सांगून पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आत्तापासून जिद्दीने जोमाने कामाला लागावे आणि पुन्हा एकदा पानगाव हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करावे असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

## थोडक्यात...

### क्रेडिट वाढ आणि सुधारित मालमत्तेच्या गुणवत्तेसाठी सहाय्यक वातावरण

**मुंबई:** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. संजीव नौटियाल म्हणाले, भारतातील मॅक्रो इकॉनॉमिक वातावरण हे नेहमीच अनुकूल राहिले आहे, तिमाही २ आर्थिक वर्ष २६ साठी ८.२% च्या मजबूत जीडीपी वाढीने क्रेडिट वाढ आणि सुधारित मालमत्तेच्या गुणवत्तेसाठी सहाय्यक वातावरण तयार झाले आहे. उज्जीवन एसएफबी च्या ठेवी गेल्या तिमाहीच्या तुलनेत ७.७% आणि वार्षिक २२.४% वाढून ४२,२२३ कोटी एवढ्या झाल्या आहेत. क्रेडीट-डिपॉझिट रेशो डिसेंबर २५ पर्यंत ८८% आहे. बँकेच्या नवीन ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून तसेच विद्यमान बँक ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे कासा % सलग २ तिमाहीत २७% च्या वर राहिले. आर्थिक वर्ष २६ चा पहिला भाग मध्ये आधीच घेतलेल्या ठेव दर कपात आणि एकूण तरलता नियोजनामुळे निधीची किंमत कमी होत राहिली

'परंपरा आणि आधुनिकते'चा नवा अध्याय सुरू

जानेवारी २०२६ : १८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्र्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे.

### झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची केली घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून, यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे.उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे जी व्हिस्कीची जाणकार असून - लाखात एक असेल. केवळ दहा लाख बॉटल्स उपलब्ध असल्याने, ही एडिशन जितकी सुंदर आहे, तितकीच दुर्मिळही आहे.

### मोटोरोला सिग्नेचर लॉँच

**मुंबई:** मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज भारतात मोटोरोला सिग्नेचर च्या लाँचची घोषणा केली, जेथे अत्याधुनिकता व लक्झरी वैयक्तिककरणासह अल्ट्रा-प्रीमियम प्रमुख स्मार्टफोनमध्ये नवीन मापदंड स्थापित केला आहे. तडजोड न करणा-या उत्कृष्टतेचा शोध घेणा-या ग्राहकांसाठी डिझाइन करण्यात आलेला सिग्नेचर प्रमुख अनुभवांना नव्या उंचीवर घेऊन जातो. या स्मार्टफोनमध्ये जागतिक दर्जाची कॅमेरा नाविन्यता, सुधारित लक्झरी कारागिरी, नेक्स्ट-जनरेशन कार्यक्षमता आणि सर्वोत्तम जीवनशैली प्रीव्हिलेजेस् आहेत. या प्रीमियम परिसंस्थेला अधिक प्रबळ करत मोटोरोला पोलारद्वारे समर्थित मोटो वॉच देखील लाँच केला आहे, जो कालातीत वॉच डिझाइनमध्ये विभागातील अग्रणी वेलनेस ट्रॅकिंग देतो.

### झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची केली घोषणा

छत्रपती संभाजीनगर - भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून, यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे.उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे जी व्हिस्कीची जाणकार असून - लाखात एक असेल. केवळ दहा लाख बॉटल्स उपलब्ध असल्याने, ही एडिशन जितकी सुंदर आहे, तितकीच दुर्मिळही आहे.

# एमजीएममध्ये शाश्वत तंत्रज्ञान विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न

## 'सस्टेनेबल टेक्नॉलॉजी : फंडामेंटल्स, प्रिंसिपल्स अँड इथिक्स' या विषयावर जगभरातील मान्यवर आपले विचार



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ जानेवारी :** एमजीएम विद्यापीठाच्या फॅकल्टी ऑफ इंटर डिसिप्लिनरी स्टडीज आणि जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'सस्टेनेबल टेक्नॉलॉजी : फंडामेंटल्स, प्रिंसिपल्स अँड इथिक्स' या विषयावर आधारित आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन समारंभ रुक्मिणी सभागृहात तुळशीला पाणी घालून मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या उद्घाटन सोहळ्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, भारतीय फोटोग्रामेटरी आणि रिमोट सेन्सिंग संस्थेचे प्रमुख डॉ.अनिल कुमार, श्री जमनालाल बजाज मेमोरियल लायब्ररी अँड रिसर्च सेंटर वर्धाचे संचालक डॉ. सिबी के.जोसेफ, व्हॅरॉक पॉलिमर्सचे महाव्यवस्थापक गणेश गारखेडकर, गांधी इंटरनॅशनल फ्रांस अँड असोसिएस्ट्स कम्युनिटी ऑफ आर्कचे संस्थापक, लुईस कॅम्पाना, गांधी इंटरनॅशनल फ्रांसचे ख्रिस्तोफ ग्रिग्री, कम्युनिकेशन इपिकचे संचालक अशीरबाद राहा, कम्युनिटी ऑफ आर्कच्या संचालिका मार्गरिट ब्रिजिट हिलर, युनिव्हर्सिटी ऑफ हैदराबादच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.पूनम सिंगल, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता जॉन चेल्लादुराई, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात शास्त्रज्ञ डॉ.अनिल कुमार यांनी 'सस्टेनेबल अँड इथिकल आर्टिफिशियल इंटेलिजियन्स/मशिन लर्निंग फॉर ॲग्रीकल्चर अॅनॅलिटिक्स' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, तंत्रज्ञान आता केवळ आर्थिक प्रगतीचे साधन राहिले नसून, मानवी अस्तित्वासाठी ते एक मूलभूत आधारस्तंभ बनले आहे. शाश्र्वत तंत्रज्ञानाच्या पायाभूत संकल्पना पर्यावरणीय परिणाम कमी करणाऱ्या, संसाधनांचा योग्य व कार्यक्षम वापर करणाऱ्या आणि दीर्घकालीन पर्यावरणीय समतोल राखणाऱ्या साधनांवर, प्रणालींवर व पायाभूत सुविधांवर आधारित आहेत. एमजीएम विद्यापीठातील विविध विभागांना दिलेल्या भेटीदरम्यान येथील प्राध्यापक व विद्यार्थी विज्ञान क्षेत्रात करत असलेले संशोधनात्मक आणि नाविन्यपूर्ण कार्य निश्र्चितच कौतुकास्पद आहे.

विविध ज्ञानशाखा एकत्रित येऊन संशोधन, नवोपक्रम आणि समाजोपयोगी तंत्रज्ञानाची दिशा निश्र्चित करणे ही काळाची गरज आहे. या परिषदेत एकूण ५६ संशोधन प्रबंध सादर होणार असून त्यातून शाश्र्वत विकासासाठी विज्ञानाची भूमिका अधिक ठळक होणार आहे. नऊ राष्ट्रीय तंत्रज्ञान मिशनद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम तंत्रज्ञान, जैवविविधता, इलेक्ट्रिक वाहने, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, महासागर संशोधन, भाषांतर आणि तळागाळातील नवकल्पना अशा क्षेत्रांमध्ये समाजाभिमुख संशोधनाला चालना दिली जात आहे. 'वेस्ट टू वेल्थ' ही संकल्पना या नऊ तंत्रज्ञान मिशनचा एक भाग असून शाश्र्वत व सर्वसमावेशक विकासासाठी ती मार्गदर्शक ठरणार असल्याचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

ही आंतरराष्ट्रीय परिषद शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ ते रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठात सुरू असणार आहे. यामध्ये एकूण ५६ शोधनिबंध सादर होणार असून यामध्ये जगभरातील तज्ञ मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार प्रा. सुखवंत कौर यांनी मानले.

## राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त मुलींच्या संगोपनाला सलाम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ जानेवारी :** राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी मुलींच्या संगोपनाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. 'घरवाली पेडवाली' मालिकेतील रमेशची भूमिका साकारणारे हर्ष वशिष्ट यांनी मुलीमुळे जीवनात संयम, क्षमाशीलता आणि प्रेमाची जाणीव अधिक दृढ झाल्याचे सांगितले.

'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंगची भूमिका करणारे योगेश त्रिपाठी यांनी मुलीच्या निरागसतेमुळे कामाच्या धकाधकीतही कुटुंबासाठी वेळ काढण्याचे महत्त्व समजल्याचे नमूद केले. 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी साकारणारे रोहिताश्र्व गौड यांनी मुलींमुळे आयुष्यात नवा उत्साह निर्माण झाल्याचे सांगत, त्या स्वावलंबी आणि सक्षम तरुणी म्हणून घडताना पाहणे अभिमानास्पद असल्याचे मत व्यक्त केले.

दरम्यान, एण्ड टीव्हीवरील 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३०, 'घरवाली पेडवाली' रात्री १० आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार प्रसारित होत आहेत.

# आता छत्रपती संभाजीनगर मध्ये ए आय युक्त सी टी करोनरी अंजिओग्राफी (हृदयची) ची सुविधा




**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ जानेवारी :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढत असून विशेषतः तरुणांमध्येही हृदयविकार आढळून येत आहेत. आतापर्यंत हृदयाच्या धमन्यांची तपासणी करण्यासाठी ॲडमिट होऊन अँजिओग्राफी करणे हाच पर्याय उपलब्ध होता. मात्र आता मेडिकल हॉस्पिटलमध्ये ए आय युक्त सी टी करोनरी अँजिओग्राफीची सुविधा सुरू करण्यात आली असून ही तपासणी ओपीडीमध्ये उपलब्ध आहे.

ही तपासणी वेदनारहित, अत्यंत कमी धोका असलेली असून तिला जागतिक मान्यता प्राप्त आहे. हृदय तपासणीसाठी कोणत्याही प्रकारच्या ॲडमिशनची आवश्यकता राहिलेली नाही. मराठवाड्यातील रुग्णांसाठी प्रथमच अल्प दरामध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती सेंटर हेड विशाल कुटे यांनी दिली.

एन्जिओप्लास्टी नंतरची फेर तपासणी किंवा बायपास शस्त्रक्रियेनंतरची फेर तपासणी यासाठी ही तपासणी उपयुक्त ठरू शकते, असे तज्ञांनी मत व्यक्त केले. पत्रकार परिषदेत हृदयविकार तज्ञ डॉ. तुकाराम आवटे, डॉ. विक्रांत देशमुख, डॉ. कुलदीप तोटावर आणि डॉ. सुमित शेजुळ उपस्थित होते.

मेडिकल हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी सांगितले की, मेडिकल हॉस्पिटलने नुकतीच पाच वर्षे पूर्ण केली असून रुग्णांना अत्याधुनिक व अद्ययावत सेवा सुविधा देत असल्याचा अभिमान आहे. मराठवाड्यातील नागरिकांनी या उच्च दर्जाच्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

# आयएमएतर्फे 'हेल्दी सिटी मॅरेथॉन २०२६'चे आयोजन

## १ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये भव्य आरोग्यदायी उपक्रम



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ जानेवारी :** इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने शहरातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'खच- क्शरश्रींहू उळीूं चरीरींहेप २०२६' या भव्य मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ही मॅरेथॉन रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन करण्यात येणार असल्याचे डॉ. अनुपम टाकळकर अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन यांनी सांगितले.या वेळी डॉ.योगेश लक्कास ,डॉ.शिवाजी पोळ,डॉ.प्रफुल्ल जटाळे उपस्थित होते.

या मॅरेथॉनमध्ये सर्व वयोगटांतील नागरिकांचा तसेच कुटुंबांचा सहभाग लक्षात घेऊन विविध अंतरांचे रन प्रकार ठेवण्यात आले आहेत. यामध्ये २ किमी व ३ किमी फॅमिली फन रन, तसेच टायमर चिप सुविधेसह ५ किमी व १० किमी रनचा समावेश आहे. फिटनेसचा प्रसार, कौटुंबिक सहभाग, सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे आणि निरोगी शहर ही संकल्पना पुढे नेण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून, छत्रपती संभाजीनगर शहरातील आयएमएतर्फे आयोजित करण्यात येणारी ही पहिलीच आणि वैशिष्ट्यपूर्ण 'हेल्दी सिटी मॅरेथॉन' ठरणार आहे.

या मॅरेथॉनसाठी अर्ली बर्ड नोंदणी शुल्क प्रति व्यक्ती ५०० रुपये ठेवण्यात आले असून, हे सवलतीचे शुल्क मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहे. २५ जानेवारी २०२६ पासून नोंदणी शुल्कात वाढ होणार असल्याने नागरिकांनी विलंब न करता लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयएमएच्या वतीने करण्यात आले आहे.

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६/२०२६.

अर्जदार :-१) सुशिलाबाई बाबुसिंग राजपुत, वय, ८२ वर्षे, धंदा. शेती, २)विनोद बाबु राजपुत, वय, ४९ वर्षे, धंदा. शेती, ३)जगदिस बाबु राजपुत, वय. ४७ वर्षे, धंदा. शेती, सर्व रा. वरखेदी खुर्द, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद, ४) रेखाबाई भगवान परदेशी, वय. ५८ वर्षे, धंदा. शेती,रा. रायपुर, ता. जि. जळगांव,

-विरुध्द-

गैरअर्जदार:- कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत बाबुसिंग ठाणसिंग राजपुत हे दि. १४/०२/२०१९ रोजी मौजे. वरखेदी खुर्द, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत बाबुसिंग ठाणसिंग राजपुत यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख: ०२/०३/२०२६.

आज दि. २१/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशानुसार,

**विभागीय लिपीक,**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव)**

**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालयः कः स्तर, सोयगांव)**

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद, (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क १७/२०२६

१) संजय बाबुराव मोरे, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध -निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे वाळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत ज्योत्सना संजय गोरे यांचा दि. १९/११/२०२५ मौजे ओझार, ता. निफाड, जि. नाशिक येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या 'पश्र्चात वरील अर्जदार क. १ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ हे मयत ज्योत्सना संजय गोरे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारय प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररिख्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल, आजरोजी दि.२२/१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ०९/०३/२०२६

**क. लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १५/२०२६.

अर्जदार-

१)किरण वसंत काळे,
वय, ५८ वर्षे, धंदा. घरकाम,
२) वैभव वसंत काळे
वय. ३७ वर्षे, धंदा, शेती,
३)विपीन वसंत काळे,
वय, ३७ वर्षे, धंदा. शेती,
सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुद्ध -

गैरअर्जदार- कोणीही नाही

प्रकरण - वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत वसंत विष्णु काळे हे दि. १४/१०/२०२५ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु आलेला असून, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत वसंत विष्णु काळे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख: ०२/०३/२०२६.

आज दि. २१/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले. आदेशांवरुन,

**विभागीय लिपीक,**
**( दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव,)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव)**

# सोयगाव बस आगारात चालक दिन उत्साहात साजरा




**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २४ जानेवारी :** येथील रोजी राज्य परिवहन महामंडळ सोयगाव बस आगारात चालक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित चालकांच्या स्वागता साठी रांगोळी काढून सजावट करण्यात आली होती.

सोयगाव बस आगारामध्ये साजरा करण्यात आलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आगाराचे माजी आगार प्रमुख तसेच सोयगाव तालुका शिक्षण अधिकारी सचिन शिंदे आणि नॅशनल विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल पाटील उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे आणि अमोल पाटील यांच्या च्या हस्ते आगारातील चालकांना पेढे भरवून सत्कार आणि गौरव करण्यात आला.

यावेळी सचिन शिंदे,अमोल पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन करून चालकांचे राष्ट्रीय विकासात मोठे योगदान असल्याचे प्रतिपादित केले.

कार्यक्रमास आगार प्रमुख मनिष जवळेकर,वाहतूक निरीक्षक सतिष अंभोरे,सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल,प्रमुख कारागीर रमेशचंद्र साबळे,सतीश पाटील, संतोष पाखरे,वाहक जयराम सूर्यवंशी,रोखपाल नसीम शेख, अण्णासाहेब ढेपले, अशोक तायडे, रवींद्र चौधरी, अमोल माळी, वर्जन जाधव, विनोद जाधव, अमोल माळी यांचेसह मोठ्या संख्येने चालक,वाहक,यांत्रिक,तसेच प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लिपिक श्री. सतिष पाटील यांनी केले.

### जाहिर नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर, गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५९/२०२६
पु.ता.१३/०३/२०२६

अर्जदार:-(१) मनिषा भ्र. रोबेन लांडगे, वय ४४ वर्ष, धंदा-घरकाम,रा. पो. राणी उंचेगाव, ता. घनसांवगी, जि. जालना.(२) अजय पिता अनिल आत्मकोर, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. ए विंग, रुम नं. १०३,शिवदर्शन कॉम्पलेक्स, दिपाली पार्कजवळ, मजरली, बेलापुर (वेस्ट) कुळगाव, अंबरनाथ, जि. ठाणे.

विरुध्द

गैरअर्जदार:- महाराष्ट्र शासन मार्फत तर्फे जिल्हाधिकारी हिंगोली.

प्रकरण:- भारतीय वारसा हक्क कायद्याचे कलम ३९० प्रमाणे लिगल हेअरशिप / वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांने मा. न्यायालयात ड. आर. डी. मात्रे यांच्या मार्फत लिगल हेअरशिप प्रमाणपत्र / वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ व २ यांची आई नामे आशा भ्र. अनिल उर्फ न्थोनी आत्मकोर हिचे दिनांक २८/०४/१९९० रोजी सेंट्रल हॉस्पिटल, उल्हासनगर येथे वृध्दपकाळाने व आजारपणाने निधन झालेले आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील नामे अनिल देवदानम आत्मकोर यांचे दिनांक २२/०९/२०१२ रोजी अंबरनाथ, ठाणे येथे वृध्दपकाळाने व आजारपणाने निधन झालेले आहे. अर्जदार क्र. १ ही मयतांची मुलगी असुन अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. १ व २ हेच मयताचे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्याशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत नामे आशा भ्र. अनिल उर्फ न्थोनी आत्मकोर यांनी त्यांच्या हयातीत मौजे अंबेलोहळ ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ३४१ मध्ये १ हे १६ आर पैकी ५६ आर शेतजमीन विकत घेतलेली आहे त्याचे कब्जे मालकीमध्ये मृत्यु पर्यंत होते. सदर मिळकत मयतांचे कायदेशीर वारसदार अर्जदार क्र. १ व २ यांच्या नावे होण्याकरिता तसेच अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारानी त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्या अर्थी हया जाहीर नोटीसीद्वारे या न्यायालयाचे बेलीफास सुचित करण्यात येते की, या नोटीसाची बजावणी संबंधीतांवर करुन आपला अहवाल या मा. न्यायालयात दिनांक १३/०३/२०२६ किंवा तत्पुर्वी दाखल करावा.करीता आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपिक** आदेशावरून
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, ( क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५६/२०२६.
पु.ता.१२/०३/२०२६

अर्जदार:-१) शाईनाथ रावसाहेब आळंजकर वय ७७ वर्षे, धंदा मजूरी रा. सिरेसाईगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) विठाबाई दिनानाथ आळंजकर वय ७७वर्षे, धंदा घरकाम रा. सिरेसायगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) संजय दिनानाथ आळंजकर वय ४४ वर्षे, धंदा मजूरी -रा. घर नं. १७-२-४८४ गल्ली नं. ४, हनुमान मंदिर जवळ, न्यु हनुमान नगर, गारखेडा, औरंगाबाद ४) कविता गुलाब मोगल वय ३९ वर्ष धंदा घरकाम रा. मु.पो. पिंपळगांव (दि) दिवशी, जि. औरंगाबाद ५) भाऊसाहेब रावसाहेब आळंजकर वय ५४ वर्षे -रा. कानिफनाथ मंदिर जवळ, सिरेसायगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद मो. नं. ९२०९३७५४३६
६) गोविंद रावसाहेब आळंजकर वय ५७ वर्षे, धंदा मजूरी -रा. सिरेसायगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
-७) विष्णू रावसाहेब आळंजकर वय ५३ वर्षे, धंदा मजूरी रा. बकवाल नगर, नायगांव, वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ७ वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १.५ ते ७ यांचे वडील व अर्जदार क्रं. २ यांचे सासरे आणि अर्जदार क्रं. ३ व ४ यांचे आजोबा नामे रावसाहेब आसाराम आळंजकर हे दिनांक०१/०१/२०२४ रोजी मौजे सिरेसायगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे वृध्दपकाळाने मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १, ५ ते ७ यांची आई व अर्जदार क्रं. २ यांची सासू आणि अर्जदार क्रं. ३ व ४ यांची आजी नामे चंद्रभागाबाई रावसाहेब आळंजकर ह्या देखील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेल्या असून त्यांच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. तसेच अर्जदार क्रं. १. ५ ते ७ यांचे भाऊ व अर्जदार क्रं. २ यांचे पती आणि अर्जदार क्रं. ३ व ४ यांचे वडील नामे दिनानाथ रावसाहेब आळंजकर हे दिनांक २४/१२/२०२४ रोजी मौजे सिरेसायगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत रावसाहेब आसाराम आळंजकर यांना अर्जदार क्रं. १. ५ ते ७ मुले असून अर्जदार क्रं. २ ही सुन आणि अर्जदार क्रं. ३नातू व अर्जदार क्रं. ४ नात या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ७ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रावसाहेब आसाराम आळंजकर यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय,निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा, त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २२ /०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**लिपिक.** आदेशावरून
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) गंगापूर यांचे न्यायालयात**

सिव्हील एम. ए. क्र. ७०/२०२६
पु. ता.०९/०३/२०२६

अर्जदार :-१) आदित्य पिता अशोक अवचरमल, वय:- २९ वर्षे, धंदा:- नोकरी,रा. तुर्काबाद/खराडी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) पायल पिता अशोक अवचरमल, वय:- १९ वर्षे, धंदा:- शिक्षण, रा. वरील प्रमाणे.३) कुणाल पिता अशोक अवचरमल, वय:- अज्ञान, धंदा:- शिक्षण, रा. वरील प्रमाणे.अ.पा.क. आई अर्जदार क्र. ५, रेखा भ्र. अशोक अवचरमल ४) तेजस्विनी पिता अशोक अवचरमल, वय:- अज्ञान, धंदा:-शिक्षण रा. वरील प्रमाणे. अ.पा.क. आई अर्जदार क्र. ५, रेखा भ्र. अशोक अवचरमल रेखा भ्र. अशोक अवचरमल, वय: ४० वर्षे, धंदा:- घरकाम, रा. वरील प्रमाणे ६) भीमाबाई भ्र. नाथाजी अवचरमल, वय:- ८५ वर्षे, धंदा:- घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री पी.डी. देशपांडे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सदर केला असून त्यातील कथन की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे पिता व अर्जदार क्र. ५ यांचे पती व अर्जदार क्र. ६ यांचा मुलगा नामे अशोक नाथाजी अवचरमल हे दि. १५/१२/२०२५ रोजी मयत झाले असून यांना अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही म्हणून त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामीविनंती केली आहे.

त्याआर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते की सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा उजर किंवा आक्षेप हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३०दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तिक किंवा त्यांचे विधीज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र जारी करेल. करिता हे जाहीर प्रगटन आज दि.२२/०१/२०२६ आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.५८/२०२६

१) सोमनाथ शंकर उर्फ शंकरआप्पा अन्नुने, वय ५७ वर्ष, व्यवसाय मजुरी, २) बाळु शंकर उर्फ शंकरराव आनुने, वय ४९ वर्ष, व्यवसाय मजुरी,दोघे रा. संतोषी माता मंदिर, अहिल्यादेवी नगर, गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) भीमाबाई गंगाधर गवंडर, वय ५८ वर्ष, व्यवसाय घरकाम,रा. माळी गल्ली, मु.पो. जातेगाव, ता.नांदगाव जि.नाशिक

विरुद्ध

गैरअर्जदार : - निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही. जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन शंकर येडुआप्पा आनुने यांचा दि.०५/०७/२०११ रोजी नगर परिषद गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद चे हददीमध्ये वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन मयत शंकर येडुआप्पा आनुने यांची पत्नी विमलबाई शंकर आनुने यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. तसेच मयत शंकर येडुआप्पा आनुने यांची आई नामे कलाबाई येडुआप्पा आनुने आणि वडील नामे येडुआप्पा आनुने यांचा देखील यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत शंकर येडुआप्पा आनुने आणि मयत विमलबाई शंकर आनुने हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. ते ३ यांचा जन्म झाला आहे. अर्जदारांचे आधार कार्ड व शासकीय कागदपत्र व दस्ताऐवजांवर मयत शंकर येडुआप्पा आनुने यांची नावे वेगळी असली तरी मयत शंकर येडुआप्पा आनुने, शंकरआप्पा व शंकरराव हे सर्व नावे एकाच व्यक्तीची म्हणजेच मयत शंकर येडुआप्पा आनुने / आनोने यांची आहे. मयतांना अर्जदार नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी दिले.

पुढील तारीख ०५/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं.६६/२०२६
प्रकरणात पुढील तारीख ०७/०३/२०२६

अर्जदार :- १)आजम रज्जाक पठाण वय ४४ वर्षे, धंदा मजूरी रा. नंद्राबाद पो. वाळूज, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) नयुम रज्जाक पठाण वय ३९ वर्षे, धंदा मजूरी रा. नंद्राबाद पो. वाळूज, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) आरेफा राजू शेख वय ४३ वर्षे, धंदा- घरकाम रा. इंदिरानगर, शिंगीता. गंगापूर जि. औरंगाबाद. ४) सुलतानाबी मुस्ताक शेख वय ३८ वर्षे, धंदा मजूरी रा. फुलशेवरा, गवळी शिवरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात अँड. असरार सी. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं.१ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणार असून अर्जदार क्रं. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांचे वडील नामे रज्जाक फकीरा पठाण दिनांक २८/०२/२००३ रोजी वृध्दपकाळाने राहत्या घरी नंद्राबाद, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं.१ ते ४ यांची आई नामे बिस्मिल्लाबी रज्जाक पठाण ह्या दिनांक ०७/१०/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचारा दरम्यान मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ४ यांचे आजी आजोबा हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे, त्यामुळे त्यांच्या मयता बाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मयत रज्जाक फकीरा पठाण व मयत बिस्मिल्लाबी रज्जाक पठाण यांना अर्जदार क्रं. १ व २ मुले व अर्जदार क्रं. ३ व ४ मुली या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रज्जाक फकीरा पठाण व मयत बिस्मिल्लाबी रज्जाक पठाण यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर

## अग्रलेख...

# अमेरिकी अशांतिदूताचा अट्टहास

जगातील सर्वांत जुनी लोकशाही असलेला अमेरिका नावाचा देश जगातील इतर लोकतांत्रिक राष्ट्रांसाठी नेहमीच नायक राहिलेला आहे. साधारणतः तीनशे वर्षांपूर्वी अमेरिका नावाचा देश अस्तित्वातच नव्हता. तो अस्तित्वात आला आणि त्याने विकसित केलेल्या लोकतांत्रिक व्यवस्थेमुळे शतकभरात त्याने जगात नाव मिळविले. जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या श्रमजीवींचे आणि बुद्धिजीवींचेही अमेरिकेने स्वागत केले. या सर्वांनी मिळून अमेरिकेला महासत्ता बनविले. त्यामुळे अमेरिकेला जाणे, अमेरिका पाहणे, अमेरिकेत राहणे हे जगातल्या अनेक देशांतील नागरिकांसाठी प्रतिष्ठेचे लक्षण होते. जगाच्या दृष्टीने अमेरिकेची प्रतिमा नायकाची होती. अशा या नायकाच्या वाट्याला डोनाल्ड ट्रम्प या राष्ट्राध्यक्षाच्या माध्यमातून एक खलनायक आलेला आहे. अमेरिकेचे अर्थसत्ता, लष्करी सत्ता आणि बौद्धिक सत्ता म्हणून असलेले वर्चस्व रसातळाला नेण्याचा जणू चंगच या महाशयांनी बांधलेला आहे. त्यातील अलिकडचे उदाहरण व्हेनेझुएलाचे आणि त्यानंतरचे अगदी ताजे उदाहरण ट्रम्प तात्यांनी ग्रीनलॅण्ड नावाच्या स्वायत्त प्रदेशावर वाकडी नजर टाकल्याचे. ग्रीनलॅण्ड हा प्रदेश उत्तर अमेरिका खंडात असला तरी तो डेन्मार्कच्या आधिपत्याखाली येतो. डेन्मार्क हा उत्तर युरोपातला देश. ग्रीनलॅण्डशी अमेरिकेचा अर्थाअर्थी संबंध नाही. पण, एखाद्या राष्ट्रप्रमुखाने गावगुंडासारखेच वागायचे ठरविले तर काय होते, याचा अनुभव साऱ्या जगालाच येत आहे. आतापर्यंत जगात कुठेही काही कमी-जास्त होत असेल तर अमेरिका तिथे नाक खुपसायचा किंवा नाक खुपसून कमी-जास्त करायचा. आताही ते थांबलेले नाही. ट्रम्प अमेरिकेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याच्या आधीपर्यंत अमेरिकेची ही सवय काहीशी मर्यादित होती. आता मी म्हणेन तेवढा कर तुम्हाला द्यावा लागेल, मला हवा असलेला प्रदेश तुम्हाला माझ्या स्वाधीन करावा लागेल, ही ट्रम्प यांची भाषा. ग्रीनलॅण्डवर नजर टाकून एका अर्थाने अमेरिकेने विस्तारवादाचे भयावह रूप जगाला दाखविण्यास सुरुवात केली आहे. अख्खा युरोप त्यामुळे ट्रम्प यांच्याविरुद्ध एकवटला आहे. ट्रम्प महाशय स्वतःच जगात युद्धसदृश परिस्थिती निर्माण करीत असताना दुसरीकडे जगातील सात-आठ युद्धे आपण थांबवल्याचा दावाही करत असतात. आपल्याला नोबेल पुरस्कार मिळावा, असा ट्रम्प यांचा आग्रह आहे. अशांतता आणि अस्थिरता पसविणाऱ्या राष्ट्रप्रमुखाने नोबेलवर हक्क सांगावा म्हणजे मोठ्ठाच विनोद आहे. अमेरिकेच्या पाठिंब्यानेच इस्रायलने गाझा पट्टीत हजारो निरपराध लोकांची कत्तल केली. आता त्या गाझा पट्टीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'बोर्ड ऑफ पीस' म्हणजे शांतता मंडळ स्थापन करण्यासाठी ट्रम्प नामक 'अशांतिदूत' पुढाकार घेत आहेत. यासाठी त्यांनी ६० देशांना अमांत्रित केले आहे. २१ देशांनी ट्रम्प यांच्या या पुढाकाराला प्रतिसाद देत त्यात सहभागी होण्याची तयारी दर्शवली. भारतासह अन्य काही देशांनी या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. जे देश तयार झालेत, ते उत्स्फूर्तपणे नव्हे तर ट्रम्प यांच्या दबावामुळे तयार झाले आहेत. या माध्यमातून ट्रम्प यांना सर्व आंतरराष्ट्रीय संघटनांना निष्प्रभ करीत जगात आपले एकमेव नेतृत्व प्रस्थापित करायचे आहे, असे दिसते. बोर्ड ऑफ पीस अस्तित्वात येणार असेल तर संयुक्त राष्ट्रांचे काय करायचे, याचे उत्तर ते देत नाहीत. संयुक्त राष्ट्रांना, आंतरराष्ट्रीय नियम व पायंड्यांना ते मोजत नाहीत. जे देश आपले ऐकत नाहीत, त्यांच्यावर आर्थिक निर्बंध ट्रम्प यांनी लादले आहेत. अनेक देशांसमोर गंभीर स्वरूपाचे आर्थिक संकट उभे झाले आहे. दुसऱ्यांसाठी खड्डा खोदणाऱ्या ट्रम्प यांनी आपल्या नकळत अमेरिकेसाठीही मोठा खड्डा खोदून ठेवला आहे हेही तेवढेच खरे. कधी ना कधी अमेरिकी लोकांच्या लक्षात ते येईलच.

अमेरिकेचे खरे हितैषी आपणच आहोत, असे दाखवत आणि तथाकथित राष्ट्रवादाचा बुरखा पांघरत ट्रम्प अमेरिकेच्या लोकांना आपल्यामागे फरफटत येण्यास भाग पाडत आहेत. कधीकाळी जगात अमेरिका आणि सोविएत युनियन अशा दोनच महाशक्ती होत्या. साडेतीन दशकांपूर्वी सोविएत युनियनचे विघटन झाले आणि जगात अमेरिका ही एकमेव महाशक्ती उरली. त्यामुळे अमेरिकेची जगात दादागिरी सुरू झाली. तरीही त्याला पूर्वी मर्यादा होत्या. ट्रम्प विचित्र आहेत. आपण राजकारणी कमी आणि व्यापारी जास्त आहोत, हे ट्रम्प नेहमी जाणवून देतात. फायद्यासाठी कोणत्याही थराला जायची त्यांची तयारी असते. अध्यक्षपदाचा पहिला कार्यकाळ संपल्यानंतर झालेल्या निवडणुकीत ज्यो बायडेन यांनी ट्रम्प यांचा पराभव केला होता. तो पराभव मानण्यास ट्रम्प यांनी नकार दिला होता. बिनडोक समर्थकांना अमेरिकेचे संसद भवन असलेल्या कॅपिटल हिलवर चालून जाण्याची चिथावणी द्यायलाही ट्रम्प यांनी मागेपुढे पाहिले नाही. अमेरिकेच्या आतापर्यंतच्या कोणत्याही अध्यक्षाने केले नसेल, एवढे नुकसान एकट्या ट्रम्प यांनी केले आहे. आताही ते तेच करीत आहेत. ते अमेरिकेची इभ्रत घालवीत आहेत. तेलाचे सर्वाधिक साठे असलेला व्हेनेझुएला बळकावल्यानंतर ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता उत्तर गोलार्धातील ग्रीनलॅण्ड या चिमुकल्या बेटावर गेली आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे पत्नीसह अपहरण केले आणि त्यांना न्यूयॉर्कच्या तुरुंगात डांबले. त्यांच्यावर अमली पदार्थाचा व्यापार आदी अनेक आरोप करत खटलाही भरला. व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांनी त्यांच्या देशात जे काही केले, त्याचे कोणालाच समर्थन करता येणार नाही. खरा प्रश्न असा की, त्यांच्यावर अशा पद्धतीने कारवाई करण्याचा अधिकार अमेरिकेला कोणी दिला? दुसरा प्रश्न असा की, ग्रीनलॅण्ड त्यांना कशासाठी हवा? आधी ग्रीनलॅण्ड हा प्रदेश पैशाच्या बळावर विकत घेण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला, पण तो फसला. आर्थिक ताकदीच्या बळावर आपल्याला हवे असलेले प्रांत विकत घेण्याची अमेरिकेची सवय जुनी आहे. याआधी अमेरिकेने अलास्का, लुईझियाना असे प्रांत विकत घेतले आहेत. जे विकत घेऊ शकत नाही, ते लष्करी बळाच्या ताकदीवर बळकवायलाही अमेरिका मागेपुढे पाहत नाही. ग्रीनलॅण्डवर अमेरिकेचा डोळा फार आधीपासून आहे. १८६७ आणि नंतर १९१० मध्ये अमेरिकेने ग्रीनलॅण्ड विकत घेण्याचा प्रयत्न केला, पण तो तेव्हा फसला होता. अमेरिकेने प्रयत्न सोडले नाहीत. हिटलरच्या जर्मनीच्या आक्रमणाचा सामना करण्यास सक्षम नसल्यामुळे ग्रीनलॅण्ड बेटाची मालकी असलेल्या डेन्मार्कने अमेरिकेकडे मदतीची मागणी केली आणि अमेरिकेने ग्रीनलॅण्ड बेटावर लष्करी तळ उभारत तेव्हा डेन्मार्कचे जर्मनीपासून रक्षण केले. आता त्याची किंमत वसूल करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. अमेरिकेच्या सुरक्षेसाठी ग्रीनलॅण्ड आवश्यक असल्याचा अमेरिकेचा दावा हास्यास्पद आहे. ग्रीनलॅण्ड अमेरिकेपासून ४८०० किमी दूर आहे. डेन्मार्क हा चिमुकला देश असला तरी पाकिस्तानसारखी त्याने अमेरिकेसमोर शरणागती पत्करलेली नाही. डेन्मार्कला पाठिंबा देणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याचाही इशारा अमेरिकेने दिला आहे. विशेष म्हणजे फ्रान्स आणि ब्रिटन यासारख्या मित्र देशांनाही अमेरिकेची ही आक्रमक आणि विस्तारवादी भूमिका मान्य नाही. डेन्मार्क हा युरोपचा भाग आहे आणि युरोपीय देशांत झालेल्या सुरक्षाविषयक करारानुसार, कोणत्याही एका देशावर झालेला हल्ला हा संपूर्ण युरोपवरील हल्ला मानला जातो. त्यामुळे अमेरिकेने ग्रीनलॅण्डवर हल्ला करून तो प्रदेश बळकावण्याचा प्रयत्न केला तर युरोपातील देश डेन्मार्कच्या मदतीला धावतील. अमेरिकेची लष्करी ताकद आणि समस्त युरोपची ताकद यांची तुलना होऊ शकत नसली तरी संघर्ष उडाला तर तिसऱ्या महायुद्धाची स्थिती निर्माण होऊ शकते. ट्रम्प यांनाही याची जाणीव असावी. त्यामुळे त्यांनी सध्या तरी आपण ग्रीनलॅण्डवर हल्ला करणार नाही, अशी मानभावी भूमिका घेतली आहे. पण, ट्रम्प कधी काय करतील, याचा भरवसा नाही. अमेरिकी अशांतिदूताचा अट्टहास जगाला कोणत्या संकटात घालेल, हेही त्यामुळेच सांगता येत नाही.

## प्रासंगिक

**प्रा. राम प्रकाश किन्हीकर**

# परीक्षा पद्धतीतले कालसुसंगत बदल

प्राध्यापकी पेशात एखाद्या हाडाच्या शिक्षकाला विद्यार्थ्यांना शिकवणे, विद्यार्थ्यांमध्ये रमणे जेवढे आवडते तेवढेच त्या शिक्षकाला दोन गोष्टी अत्यंत टाळाव्याशा वाटतात. पण गंमत अशी आहे की टाळाव्याशा वाटणाऱ्या या दोन्ही गोष्टी त्याच्या पेशाचा अविभाज्य अंग असल्याने त्याने कितीही टाळाव्या म्हटल्यात तरी तो टाळू शकत नाही. एक म्हणजे परीक्षांदरम्यान पर्यवेक्षण करणे आणि दुसरी म्हणजे परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासणे. माझ्या बाबतीत मी या दोन्हीवर उतारा काढलाय. पर्यवेक्षण सुरू असताना जे आवश्यक काम आहे (परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिकांवर सह्या, बारकोड्स चिकटवणे, परीक्षाविषयक इतर नोंदी करणे वगैरे) ते साधारण अर्ध्या तासात संपवून उरलेला दीड-अडीच तास हा अगदी आपला वेळ असतो. या वेळात मी माझ्या लिखाणासंबंधी चिंतन करतो. एखादे टिपण घ्यावेसे वाटले तर जवळच्या छोट्या डायरीत टिपून घेतो. मनात खूप दिवसांपासून घोळत असलेल्या एखाद्या कल्पनेचा विस्तार करायचा असेल तर या वेळासारखा दुसरा वेळ नाही. हा वेळ मी असा सत्कारणी लावतो. आणि परीक्षा झाल्या झाल्या पेपर्स तपासून घेतले म्हणजे मग पेपर तपासणीचे कामसुद्धा कंटाळवाणे होत नाही. अशा प्रकारे शिक्षकी पेशातल्या या टाळाव्याशा वाटणाऱ्या पण टाळता न येणाऱ्या बाबींवर मी माझा तोडगा काढलेला आहे.

या पर्यवेक्षणादरम्यान माझ्या मनात या परीक्षा पद्धतींबाबत कायमच एक प्रश्नचिन्ह तयार होत असते. आजची आपली पारंपरिक परीक्षा पद्धती ही कालबाह्य होतेय का? आणि होत असली तर सर्वांनाच हे पटूनही त्यावर उपाययोजना का होत नाही? पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धतीला माझा विरोध नाही. ज्या ज्या देशांनी, संस्कृतींनी पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धतीला पहिलेपासून झुगारून दिलेले आहे त्यांच्या शिक्षणपद्धतीचे काय हाल झालेत? ते आपण आज बघतोय. पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धती हवीच पण ती पदवीला प्रवेश घेईपर्यंत. तोपर्यंत विद्यार्थ्यांचा मेंदू पाठांतरावर छान तयार व्हायला हवा.

पदवी परीक्षेत मात्र पाठांतरावर भर नकोय. पदवीच्या अगदी पहिल्या वर्षापासूनच. पदवी मिळवतोय म्हणजे जो विषय आपण पदवीसाठी निवडलाय त्यात मला कौशल्य प्राप्त करायचेय. मग त्यात आपली पारंपरिक परीक्षा पद्धती थिटी पडतेय असे मला ठामपणे वाटत आलेले आहे. या सर्व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या पाठांतर परीक्षेऐवजी त्यांनी त्या विषयातले किती कौशल्य अर्जित केले याचे मूल्यमापन व्हावे असे मला वाटते. आणि आजचा काळ हा सर्वार्थाने या सर्व बदलांसाठी अनुकूल असताना तर हे करणे अत्यंत सोपी आहे. फक्त कुणीतरी तसा ठाम निर्णय घेऊन तसे पाठबळ या नवविचारांना द्यायला हवे.

कोरोना काळात घरी बसल्या बसल्या, महाविद्यालयात रोजचे जाण्यायेण्याचे तास वाचल्याने, फक्त थेअरी लेक्चर्स घ्यायचे असल्याने प्रात्यक्षिकांचे तास वाचल्याने उरलेल्या वेळात आपल्यापैकी बऱ्याच जणांनी कोर्सेरासारख्या ऑनलाईन माध्यमावर अनेक विषय शिकले. मी पण त्यातलाच एक होतो. माझ्या विषयाव्यतिरिक्त मी अनेक नवीन तंत्रज्ञान त्या माध्यमातून शिकलो. त्या अभ्यासक्रमात अनेक तज्ज्ञांची व्हिडीओ लेक्चर्स असतात, त्यांच्या नोट्स दिलेल्या असतात. आपण ते बघायचे आणि आपल्याला कळलेय की नाही हे बघायला त्यांच्या परीक्षा द्यायच्यात. परीक्षा पण ऑनलाईनच. परीक्षेदरम्यान त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना आपण त्यांचे व्हिडीओ बघू शकतो, नोट्स वाचू शकतो. कारण शेवटी ही परीक्षा आपल्या आकलनाची असते आपल्या पाठांतराची नव्हे. आणि परीक्षेतले प्रश्न सुद्धा नोट्स वाचून, व्हिडीओज पाहून त्यातून थेट उत्तरे देण्यासारखे नसतात. परीक्षेतले प्रश्न सुद्धा आपल्या आकलनावर आधारित असतात आणि बऱ्याचशा विषयांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी चक्क ८० टक्के गुण मिळवायचे असतात. समजा एखाद्या दिवशी आपण त्या परीक्षेत तेवढे गुण प्राप्त करू शकलो नाही तर पुन्हा २४ तासांनीच ती परीक्षा पुन्हा द्यायला मिळते तोपर्यंत तो पेपर आपल्या कॉम्प्युटरवर पुन्हा उघडत नाही. २४ तासांत पुन्हा तेवढे ज्ञान प्राप्त करायचे, तेवढे आकलन प्राप्त करायचे आणि मग परीक्षा द्यायची. मला ही पद्धत फार आवडली.

आज मी संगणक अभियांत्रिकी, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता वगैरे क्षेत्रातले विद्यार्थी आजच्या पारंपरिक परीक्षा पद्धतीत प्रोग्रॅमिंगचे पेपर्स लिहिताना बघितले की त्यांची, त्यांचे पेपर्स तपासणाऱ्यांची आणि या एकूणच परीक्षा पद्धतीची कीव येते. एखादा कॉम्प्युटर प्रोग्राम कागदावर लिहिताना तो नीट चालतोय की नाही हे त्या विद्यार्थ्याला कसे कळणार? तो प्रोग्राम बरोबर लिहिलाय की नाही हे त्या पेपर तपासणाऱ्याला तरी कसे कळणार? हे माझ्यापुढचे गहन प्रश्न आहेत. त्यापेक्षा त्यांची अशी कोर्सेरा पद्धतीची परीक्षा झाली असती तर तो प्रोग्राम चालतोय की नाही हे त्यांचे त्यांनाच कळले असते. त्यातल्या चुका कशा काढायच्या याचे कौशल्य त्यांचे त्यांनीच मिळवले असते. यात परीक्षकाची भूमिका केवळ तसा पेपर देण्याची आणि अशा ऑनलाईन माध्यमात जर व्यवस्थित नियोजन केले तर प्रत्येक विद्यार्थ्याला एकाच काठिण्यपातळीचे पण वेगवेगळे प्रोग्राम्स लिहायला सांगता येऊ शकेल त्यामुळे एकमेकांचे बघून लिहिणे वगैरे प्रकार टळू शकतील.

आजकाल तर कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरून अनेक सॉफ्टवेअर कंपन्या विद्यार्थ्यांची घरबसल्या परीक्षा घेत असतात. एकाच वेळी अक्षरशः हजारो विद्यार्थ्यांची. त्यात त्या विद्यार्थ्याने परीक्षेच्या विंडो व्यतिरिक्त दुसरी विंडो (गूगल, चॅट जीपीटी वगैरेला विचारण्यासाठी) नुसती उघडली तरी त्या विद्यार्थ्याची परीक्षाच रद्द होते. त्या विद्यार्थ्याच्या लॅपटॉप / डेस्कटॉपचा कॅमेरा त्या विद्यार्थ्याच्या सगळ्या हालचाली टिपत असतो. थोडीही संशयास्पद हालचाल, बोलणे त्यात दिसले की एक वॉर्निंग येते आणि त्या वॉर्निंगला भीक न घालता आपण आपले चुकीचे काम सुरूच ठेवले तर त्या विद्यार्थ्याची ती परीक्षा रद्द होते.

आणखी एक मुद्दा. वर्षभर शिकवून वर्षाअखेर एका तीन तासांच्या परीक्षेत त्या विद्यार्थ्याचे ज्ञान जोखण्याची जुनी पद्धती कशाला? वर्षभर त्या विद्यार्थ्याने महाविद्यालयात किती प्रोजेक्टस केलेत, किती संशोधन केले, किती विविध कौशल्ये आत्मसात केलीत, त्याची आकलन क्षमता किती आहे, याचे गुणांकन त्या त्या वेळी त्या त्या शिक्षकाने केले तर शेवटी ही परीक्षा घेणे हेच कालबाह्य ठरेल. अंतिम तीन तासांच्या परीक्षेचा आणि त्या विद्यार्थ्याने वर्षभर केलेल्या मेहनतीचा संबंध आपल्याला तोडता येणार नाही का? बरे या अंतर्गत मूल्यमापनात हे शिक्षक जर भेदभावपूर्वक वागणूक करीत असतील तर त्यावरही अंकुश ठेवण्याची यंत्रणा अगदी सहज उभारता येऊ शकते. असलेल्या कौशल्यापेक्षा जास्त मूल्यमापन करण्याचे एखाद्या संस्थेने ठरविले आणि त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्यांचे ओव्हरव्हॅल्युएशन केले तर ती एक केवळ कागदी सूज ठरेल. कारण असे ओव्हरव्हॅल्युड विद्यार्थी जेव्हा नोकरीसाठी त्या त्या कंपन्यांमध्ये, आस्थापनांमध्ये जातील तेव्हा त्यांच्या या फुगवलेल्या गुणांचे पितळ उघडे पडेल आणि त्या त्या महाविद्यालयाची, विद्यापीठाची विश्वासार्हता धोक्यात येईल. याउलट आकसापोटी जाणूनबुजून एखाद्या विद्यार्थ्याला कमी गुण प्रदान करणाऱ्यांवरही महाविद्यालयांतर्गत, विद्यापीठांतर्गत कठोर अंकुश ठेवण्याची यंत्रणा राबवता येईल. थोडक्यात काय, आजची लक्षात ठेवण्याची क्षमता तपासणारी पारंपरिक परीक्षा पद्धती आपल्याला विद्यापीठातल्या पदवी स्तरापासून पुढे नक्की टाळता येऊ शकते. त्याऐवजी विद्यार्थ्यांची कौशल्ये तपासण्याची पद्धती आणायला आजच्या युगात फार श्रम पडणार नाहीत. गरज आहे ती शिक्षणतज्ज्ञांच्या जबरदस्त इच्छाशक्तीची आणि त्यांना सरकारमधल्या, विद्यापीठामधल्या, समाजातल्या सर्वच घटकांकडून मिळणाऱ्या अगदी सकारात्मक सहकार्याची.

९९२२११६६८७

(लेखक गेली तीस वर्षे अभियांत्रिकी अध्यापन क्षेत्रात आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# हिंद दी चादर गुरू तेग बहादूर

भारतीय इतिहासात धर्म, स्वातंत्र्य, त्याग, जीवनमूल्य आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांची मोठी परंपरा आहे. या परंपरेत अनेकांनी स्वतःच्या जीवनाचे बलिदान दिल्याची देखील उदाहरणे पाहावयास मिळतात. 'देव, देश अन् धर्मासाठी, प्राण घेतले हाती' या ओळी प्रत्यक्ष जगलेल्या अनेक महापुरुषांचे चारित्र्य आजही प्रेरणादायी ठरतात. या शृंखलेत शिखांचे नववे गुरू श्री गुरू तेग बहादूर यांचे नाव अग्रस्थानी आहे. त्यांचे बलिदान अर्थात शहिदी, धर्मासाठी आणि अत्याचारा विरोधातील सर्वोच्च बलिदान आहे. काश्मीरमधील पंडितांवर होत असलेल्या धार्मिक अत्याचारांविरोधात उभे राहून त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. काश्मिरी पंडितांनी गुरू तेग बहादूर यांना 'हिंद दी चादर' असे संबोधले. चादर म्हणजे संरक्षण, आश्रय आणि ऊब. त्यांनी हिंदूंच्या धर्मस्वातंत्र्याचे रक्षण केले म्हणूनच आजही ते सर्वांसाठी आदर्श आहेत.

१७ व्या शतकात औरंगजेबाच्या शासन काळात जिझिया कर, बळजबरीने धर्मांतरण, मंदिरांचा विध्वंस आणि हिंदू-शिखांवर सतत आणि अत्यंत क्रूर पद्धतीने होणाऱ्या अत्याचारामुळे समाजातील प्रत्येक जण पीडित होता. काश्मीरमध्ये राहणाऱ्या पंडितांवर तर अमानुष अत्याचार सुरू होते. धर्म बदला किंवा अत्याचार सहन करा अशी ताकीदच औरंगजेबाच्या मोघल सैन्याने तेथील जनतेला दिली. त्याच्या अत्याचारांमुळे त्रस्त काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ आनंदपूर साहिब येथे गुरू तेग बहादूर यांच्याकडे आले. त्यांनी आपली व्यथा त्यांच्याकडे मांडली आणि आमच्या धर्माचे रक्षण कोण करेल? असा प्रश्न उपस्थित केला. यावर गुरू तेग बहादूर यांनी या संकटाला स्वतःचे संकट मानले. त्यांनी स्पष्ट सांगितले की, धर्मस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी बलिदान द्यावे लागले, तरी हरकत नाही पण धर्मरक्षण होईलच. त्यानंतर त्यांनी औरंगजेबाला आधी माझे धर्मांतरण करा, मग इतरांचे असा संदेश दिला. सत्तेच्या उन्मादात असलेल्या धर्मांध औरंगजेबाला हे एकप्रकारे आव्हानच होते. औरंगजेबाने गुरू तेग बहादूर यांना अटक केली. त्यांच्यासोबत भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयालदास या तिघांना देखील ताब्यात घेतले. गुरू आणि शिष्यांना धर्मांतरण करण्यासाठी सांगण्यात आले. पण ते आपल्या म्हणण्यावर अढळ होते. अखेर ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीच्या चांदणी चौकात प्रथम भाई मतीदास यांना आरीने उभे चिरून त्यांची हत्या केली गेली. भाई सतीदास यांना कापसात गुंडाळून जिवंत जाळण्यात आले, तर भाई दयालदास यांना उकळत्या पाण्यात टाकून ठार केले. आपल्या समोरच तीनही शिष्यांची क्रूर हत्या झाल्याचे पाहून देखील गुरू तेग बहादूर ना डगमगले ना त्यांनी धर्मांतरणाला संमती दिली. अखेर त्यांचा देखील शिरच्छेद करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. धर्मासाठीचे हे सर्वांत मोठे बलिदान अर्थात शहिदी आहे. बलिदानानंतर गुरू तेग बहादुरांचे पुत्र गुरू गोबिंद सिंग त्यांनी खालसा पंथाची स्थापना केली. देव, देश आणि धर्मासोबतच अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघटित प्रतिकाराची परंपरा निर्माण केली.

'सकल जगत् मे खालसा पंथ गाजे, जगे धर्म हिंदू सकल भंड बाजे' असे म्हणत अत्याचारी मोघलांचे आक्रमण संघर्ष करून त्यांनी थोपविले. श्री गुरू गोबिंद सिंग शीख धर्माचे दहावे आणि अंतिम गुरू होते. त्यांनी धर्म रक्षणार्थ मोघलांसोबत तब्बल ४२ वर्षे संघर्ष केला. ७ ऑक्टोबर १७०८ रोजी विदर्भा लगत असलेल्या मराठवाड्यातील नांदेड येथे त्यांनी देह ठेवला. तेथे सचखंड गुरुद्वारा आहे. यावर्षी गुरू तेग बहादुरांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण झाली आहेत. देशभरातील शीख धर्माचे अनुयायी त्याचे स्मरण करीत आहेत. महाराष्ट्रात देखील या बलिदानाचे स्मरण केले जात आहे. गुरुग्रंथ साहिबमध्ये संत नामदेवांचे ६१ दोहे आणि शिखांचे अंतिम गुरू गोबिंद सिंग यांनी देह ठेवला तो नांदेड येथील सचखंड गुरुद्वारा असा महाराष्ट्राचा थेट संबंध या परंपरेशी आहे. गुरू तेग बहादूर यांच्यासोबत त्यावेळी असलेले आणि गुरुनानक नाम लेवा संगत अशी ओळख असलेल्या शीख, शिकलकरी, लबाणा, बंजारा, मोईयाल, सिंधी, वाल्मीकि, उदासीन संप्रदाय, वारकरी संप्रदाय यांच्या माध्यमातून ३५० वर्ष पूर्ण झालेल्या शहिदीचे स्मरण करण्याकरिता नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खरं म्हणजे आजपर्यंत धर्मासाठी सर्वोच्च बलिदानाची परंपरा असलेला इतिहास काहीसा उपेक्षित राहिला किंबहुना राजकीय स्वार्थापोटी जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवला गेला. पण आता हा इतिहास महाराष्ट्र शासन आणि दमदमी टकसालचे प्रमुख बाबा हरनामसिंग, रा. स्व. संघ धर्मजागरण विभाग यांच्या पुढाकाराने समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम करण्यात आले. यापैकीच एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे केले असून हा कार्यक्रम प्रत्येक राष्ट्रभक्त हिंदूसाठी प्रेरणा देणारा सोबतच समरसता आणि हिंदू एकतेचा संगम ठरेल.

९४२२८६२४८४


## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# 'प्रिय अशोकराव...' एक श्रद्धांजली ग्रंथ!

प्रिय अशोकराव : विचारांचा दीपस्तंभ, जो काळाच्या पलीकडे उजळत राहील. काही व्यक्ती काळाच्या चौकटीत बसत नाहीत. त्या काळ घडवतात. डॉ. अशोकराव गजानन मोडक हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांच्या स्मृतींना अर्पण केलेला 'प्रिय अशोकराव' हा श्रद्धांजली ग्रंथ म्हणजे केवळ आठवणींचा संग्रह नाही, तर विचार, मूल्ये आणि राष्ट्रनिष्ठेचा जिवंत दस्तावेजच म्हणावा लागेल.

भारतीय सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ शैक्षणिक, राजकीय किंवा सामाजिक चौकटीत बंदिस्त होत नाहीत, ती विचार, मूल्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचा जिवंत संगम असतात. दिवंगत डॉ. अशोकराव मोडक हे अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचे आयुष्य म्हणजे ज्ञान, चारित्र्य, सेवाभाव आणि राष्ट्रचेतना यांचा समन्वय असलेली एक प्रेरणादायी गाथा होती. त्यांना केवळ प्राध्यापक, आमदार, विद्यार्थी संघटक किंवा विचारवंत म्हणून ओळखणे अपुरे ठरेल. कारण ते एका काळाचे मार्गदर्शक, विचारांचे शिल्पकार आणि समाजासाठी नैतिक दीपस्तंभ होते. १९४० ते २०२६ या प्रदीर्घ कालखंडात शिक्षण, समाजकारण, वैचारिक चळवळी आणि राष्ट्रचिंतन या सर्व क्षेत्रांत अशोकरावांनी आपला ठसा उमटवला. या ग्रंथातून त्यांच्या जीवनकार्याचा पट अत्यंत शिस्तबद्ध, संदर्भयुक्त आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यात आला आहे. त्यामुळे, हा ग्रंथ केवळ एक भावनिक श्रद्धांजली म्हणून नव्हे, तर शैक्षणिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. हा स्मरणग्रंथ, श्रद्धांजली संग्रह ई-बुकाचे लेख संकलन, देवदत्त जोशी, अभय बापट, राजेश प्रभू साळगावकर यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि वैचारिक शिस्त जपत केले असून, संपादन व ई-बुक निर्मिती, राजेश प्रभू साळगावकर यांनी केले आहे. संपूर्ण ग्रंथरचना ही विचार, शिस्त आणि सौंदर्यबोध यांचा समतोल साधणारी आहे. तर, डॉ. अशोकराव मोडक यांचे जीवनकार्य, विचारनिष्ठा आणि संघभावना पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने, वैचारिक अधिष्ठानावर आधारित या स्मरणग्रंथाचे प्रकाशन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.



या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते शोकभावनेत अडकून राहत नाही. उलट, अशोकरावांनी आपल्याला काय दिले? आणि तो वारसा आपण कसा पुढे नेणार? याचा रोडमॅप आहे. मान्यवरांचे शोकसंदेश, कुटुंबीयांच्या भावना आणि सहकाऱ्यांच्या आठवणी एकत्र येऊन एका विचारवंताचे पूर्ण व्यक्तिचित्र उभे करणारे हे ई-बुक आहे. यात अरुण करमरकर, डॉ. जयंत कुलकर्णी, अभय बापट, पराग शरदकुमार वेदक, मकरंद मुळे, डॉ. प्रशांत पेशकार, कौंतेय देश, दुर्गेश परुळेकर, प्रा. धनंजय कुलकर्णी, डॉ. सुहास पेडणेकर, प्रा. नीला सहस्रबुद्धे, नवनीता तेलंग, दिनेश रणदिवे, लीना ओक-मॅथ्यू, शोभना भिडे (नाशिक), अरुण करमरकर (दुसरा लेख), नीलेश मदाने, शरमणी मराठे, सीमा मिलिंद कांबळे, दिलीप महाजन, प्रा. डॉ. प्रशांत धर्माधिकारी (बडोदा) आणि राजेश प्रभू साळगावकरांनी आपले अनुभव मांडले आहे.

**शिक्षक ते विचारवंत : एक प्रेरणादायी प्रवास** : डॉ. मोडक यांचे संशोधन जागतिक स्तरावर ख्यात असले तरी त्याचा केंद्रबिंदू भारतीय सभ्यतेचा आत्मा होता. त्यांनी मार्क्सवाद, समाजवाद आणि पाश्चात्त्य राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास अनुकरणासाठी नव्हे, तर तुलनात्मक आत्मचिंतनासाठी केला. राष्ट्रीय जाणिवेपासून तुटलेले शिक्षण निर्जीव ठरते आणि बौद्धिक शिस्तीशिवाय राष्ट्रवाद गोंगाट बनतो. त्यांच्या व्याख्यानांतून एक मूलभूत प्रश्न सतत उलगडत असे भारत आधुनिक जगाशी संवाद साधताना आपला सांस्कृतिक आत्मा कसा जपू शकतो? हा विचारच त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मूल्यांशी नैसर्गिकरीत्या जोडतो. त्यांच्या दृष्टीने संघ म्हणजे राजकीय मंच नव्हता, तर चारित्र्य, संयम आणि सेवाभावाची प्रयोगशाळा होती. जिथे कर्म, शिस्त आणि नम्रता घडते.

स्वामी विवेकानंद, सावरकर, गोखले, लोहिया यासारख्या विचारवंतांवरील त्यांच्या लेखनात विचारशील उदारता आणि वैचारिक प्रामाणिकता दिसून येते. त्यांनी कुणालाही अंधपूज्य किंवा अंधविरोधाचा विषय बनवले नाही. तर त्या काळातील नैतिक संघर्षांचे प्रतिनिधी म्हणून समजून घेतले. डॉ. मोडक हे केवळ प्राध्यापक नव्हते, तर शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे साधन आहे, यावर ठाम विश्वास असलेले विचारवंत होते. वर्गखोलीत ज्ञान देताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, मूल्यांची जाणीव आणि सामाजिक जबाबदारी रुजवली. या ग्रंथातील सहकाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या लेखनातून त्यांचे हे व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने समोर येते. शैक्षणिक क्षेत्रापुरते न थांबता, अशोकरावांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय भूमिका बजावली. विधानपरिषद सदस्य म्हणून त्यांनी मांडलेले विचार, एकात्म मानवदर्शनावरील त्यांचे चिंतन आणि राष्ट्रीय प्रश्नांवरील स्पष्ट भूमिका या ग्रंथात ठळकपणे प्रतिबिंबित होतात. त्यामुळे हा संग्रह विचार आणि कृती यांचा संगम कसा असावा याचे उत्तम उदाहरण ठरतो.

**पुढील पिढीसाठी वैचारिक ठेवा** : सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ शैक्षणिक, राजकीय किंवा सामाजिक चौकटीत बंदिस्त होत नाहीत तर ती विचार, मूल्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचा जिवंत संगम असतात. दिवंगत डॉ. अशोकराव मोडक हे अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचे आयुष्य म्हणजे ज्ञान, चारित्र्य, सेवाभाव आणि राष्ट्रचेतना यांचा समन्वय असलेली एक प्रेरणादायी गाथा होती. त्यांना केवळ प्राध्यापक, आमदार, विद्यार्थी संघटक किंवा विचारवंत म्हणून ओळखणे अपुरे ठरेल. कारण ते एक काळाचे मार्गदर्शक, विचारांचे शिल्पकार आणि समाजासाठी नैतिक दीपस्तंभ होते. 'प्रिय अशोकराव' हा संग्रह संशोधक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विचारप्रवण वाचकांसाठी मार्गदर्शक ठरतो. तो आपल्याला केवळ एका व्यक्तीचे स्मरण करून देत नाही, तर विनम्रता, अभ्यासूवृत्ती आणि राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन करतो. अशोकराव मोडक यांचा देहकाल जरी संपला असला, तरी त्यांच्या विचारांचा प्रकाश या ई-बुकातून पिढ्यान्‌पिढ्या उजळत राहणार आहे.

९२७०३३३८८६

## पथदिव्यांसंबंधी सूचना

दोन दिवसांनंतर रथसप्तमी तसेच २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) साजरा होणार असून त्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालये तसेच विविध संस्थांमध्ये प्रात्यक्षिक सरावाला सुरुवात झालेली आहे. रथसप्तमीनिमित्त अनेक योगप्रेमी पहाटे सूर्यनमस्कारासाठी एकत्र येतात. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त सराव सुरू आहे. यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, सायकलस्वार तसेच पायी जाणारे नागरिक पहाटेच्या वेळेत घराबाहेत पडतात. मात्र त्यावेळी मुख्य मार्ग सोडल्यास सगळीकडील पथदिवे बंद झालेले असतात. जवळजवळ सव्वा सहा, साडे सहा वाजेपर्यंत सर्वत्र अंधार असतो. त्याच वेळी भटक्या कुत्र्यांची टोळकी सावजाच्या शोधात असतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे संबंधित विभागाला नम्र विनंती आहे की, ऋतूनुसार आणि परिस्थितीनुसार पथदिवे सुरू-बंद करण्याचे नियोजन करण्यात यावे. काही दिवसांनंतर दिवस लवकर उजाडू लागेल, त्या वेळी वेळापत्रकात आवश्यक ते बदल करता येतील. मात्र सध्याच्या काळात योग्य नियोजन केल्यास नागरिकांची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही तसेच सुरक्षितता अबाधित राहील. संबंधित विभागाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य ते उपाय करावे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## रस्ते खोदून ठेवणाऱ्या ठेकेदारांवर अंकुश नाही का?

नागपुरातील रस्ते नवीन करणे, डांबरीकरण करणे, सिमेंट रस्ते बांधणे सुरू आहे. परंतु हे रस्ते तयार झाले की लगेच कुठलातरी ठेकेदार येतो. गॅस, पाणी, टेलिफोन व इतर पाईप टाकण्यासाठी हे रस्ते खोदतो. हे आधी का करीत नाही हा अनंत काळापासूनचा प्रश्न आहे. हे रस्ते खोदले की ते व्यवस्थित बुजविले जात नाहीत. फक्त दगड आणि माती टाकून तात्पुरते दुरुस्त केले जातात. खेता ब्रदर्स लेआऊट, खामला परिसरात असेच रस्ते खोदले आणि आता निवडणुका आल्या म्हणून थातुरमातुर दुरुस्त केले असे दाखविले. ज्या ठेकेदाराणे हे रस्ते खोदले होते त्याने इतके दिवस म्हणजे जवळपास नऊ महिने तसेच का ठेवले? लोकांना होणाऱ्या त्रासाची ठेकेदार आणि प्रशासन यांना जाणीवच नाही असे म्हणावे लागेल. अतिशय महत्त्वाचा खामला चौक अथवा ऑरेंज सिटी चौकामधील रस्ता एका बाजूने खोदला आणि ती नाली फक्त माती टाकून बुजविली. या चौकात प्रचंड वाहतूक आहे. आता ती नुसती नाली नसून प्रचंड मोठा खड्डा झाली आहे. लोकांची वाहने त्यातून जातात. एक सर्कस सुरू आहे. अपघातला आमंत्रण आहे. याकडे ठेकेदार अथवा प्रशासनाचे लक्ष का नाही? यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि मग तो रस्ता दुरुस्त झाला पाहिजे.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

## वाचक पत्रे

## प्रजासत्ताक दिन : कर्तव्यांचे आत्मचिंतन

दोन दिवसांनी आपण प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशात संविधान लागू झाले. लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही संविधानाची मूलभूत तत्त्वे आहेत. संविधानाने दिलेले अधिकार उपभोगताना त्या अधिकारांशी निगडित कर्तव्यांप्रति आपण किती जागरूक आहोत, याचे आत्मचिंतन करण्याचा हा दिवस आहे. आत्मचिंतन करताना एक महत्त्वाचा प्रश्न मनात येतो, आपण एक सुज्ञ नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांप्रति किती सजग आहोत? संविधानाने जसे आपल्याला मूलभूत अधिकार दिले आहेत, तसेच काही मूलभूत कर्तव्येही दिली आहेत. त्यामध्ये मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, सामाजिक सौहार्द जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि देशहिताला प्राधान्य देणे यांचा समावेश आहे. या प्रत्येक कर्तव्याचे आपण कितपत प्रामाणिकपणे पालन करतो, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

आज आपण पाहतो की सरकारी तसेच खाजगी क्षेत्रात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावलेला आहे. लाच देणे-घेणे, कर न भरणे, सार्वजनिक मालमत्तेचा दुरुपयोग करणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणे, कायद्याचे पालन न करणे, मतदानाबाबत उदासीनता दाखवणे, तसेच रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे, या सर्व समस्या समाजात ठळकपणे दिसून येतात. पण या सगळ्यांसाठी केवळ सरकारच जबाबदार आहे का? निश्चितच नाही.

या समस्यांना आपण सर्व नागरिकदेखील तितकेच जबाबदार आहोत. त्यामुळे "मी देशासाठी काय करतो आहे?", "मी माझ्या कर्तव्यांचे प्रामाणिक पालन करतो आहे का?" असे प्रश्न स्वतःला विचारून आत्मपरीक्षण करण्याचा हा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाने जर आपले अधिकार आणि कर्तव्य यांची योग्य सांगड घालून जबाबदारीने वागण्याचा संकल्प केला आणि देशभक्ती केवळ घोषणांपुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन वागणुकीत उतरवली, तरच खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक दिवस सार्थ होईल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निळकंठेश्वर साखर कारखान्याने दिड लाखांचा टप्पा ओलांडला



**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २४ जानेवारी :** अनेक वर्षापासून बंद असलेल्या तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने चालू हंगामात दीड लाख मेट्रिक टनाचे गाळप करुन उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करून विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. काटेकोर नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर आणि शेतकरी व कारखाना प्रशासन यांच्यातील उत्तम समन्वय यामुळे हे उद्दिष्ट वेळेत साध्य झाले असून संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारखान्यात दररोज सरासरी २८०० ते २९०० मेट्रिक टन प्रति दिन इतक्या क्षमतेने अखंड गाळप सुरू आहे. विशेष म्हणजे यंदा साखर उताराही समाधानकारक आणि चांगला मिळत असल्याने कारखान्याच्या आर्थिक स्थितीला भक्कम आधार मिळाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली कामगार, अधिकारी आणि संचालक मंडळ यांनी एकसंघपणे केलेल्या प्रयत्नांचे यश असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.ज्या शेतकऱ्यांचा ऊस अद्याप शिल्लक आहे त्यांनी कोणतीही चिंता करू नये. शेवटच्या शेतकऱ्याचा ऊस गाळप होईपर्यंत कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यात येणार आहे. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

निळकंठेश्वर साखर कारखाना परिसरातील शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरत आहे. वेळेवर गाळप, चांगला उतारा आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या धोरणामुळे कारखान्याने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. आगामी काळातही शेतकरी, कामगार आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने आणखी मोठी उद्दिष्टे गाठली जातील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २४ जानेवारी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा राज्यशास्त्र,लोकप्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन निलंगा तहसीलचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के एन कदम, उप प्राचार्य डॉ.बी एस गायकवाड, प्रा. पी पी गायकवाड हे उपस्थित होते. महाविद्यालयामार्फत घेण्यात आलेल्या भितीपत्रक, घोषवाक्य, निबंध, रांगोळी, वकृत्व, वादविवाद स्पर्धेची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ व्ही पी सांडूर प्रा बदनाळे एस एस, प्रा माने पौर्णिमा, प्रा सातपुते पूनम आदींनी प्रयत्न केले.

## अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुकाध्यक्षपदी सचिन शेटे तर तालुका संघटकपदी ज्ञानेश्वर सांगवे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २४ जानेवारी :** अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडी ता.२२ जानेवारी रोजी शहरातील शिवकुमार सोनटक्के यांच्या माय मंदिर येथे ही निवड करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे,राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेटे,लातूर जिल्हा अध्यक्ष ड.विलास खिंडे, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत कोरे, संपर्कप्रमुख सचिन मंगनाळे,धार्मिक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ शिवणे सह विविध मान्यवर उपस्थित होते.सर्व उपस्थित मान्यवरांच्या वतीने अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.यामध्ये तालुका अध्यक्ष पदी सचिन शेटे,तालुका संघटक पदी ज्ञानेश्र्वर सांगवे,तालुका कमिटी सदस्यामध्ये शिवराज काळगे,संगम हवा, चंद्रकांत पाटील,श्रीराम धनशेट्टे,राजेश्र्वर पाटील, गणेश मोरगे आदींची निवड करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच सचिव शेटे व ज्ञानेश्र्वर सांगवे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## कॉपी आढळल्यास परीक्षा केंद्राचा परवाना होणार रद्द

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांदरम्यान, कॉपीमुक्तीसाठी प्रयत्न जारी ठेवले असून, लातूर विभागीय परीक्षा मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या बोर्ड परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यावर्षीही परीक्षा केंद्रावर कॉपी आढळल्यास केंद्र रद्दची कारवाई होणार आहे.

गतवर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांच्या कार्यक्रमात दहावी, बारावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी ज्या केंद्रावर कॉपी आढळेल, ती परीक्षा केंद्र रद्द करण्याचे जाहीर केले होते. हा निर्णय यावर्षीच्या परीक्षेवेळी कायम ठेवला जाणार आहे. लातूर विभागीय परीक्षा मंडळाअंतर्गत येणाऱ्या नांदेड, धाराशिव व लातूर जिल्ह्यांतून इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा एक लाख ११ हजार २८७ विद्यार्थी देणार आहेत. ही दहावीची परीक्षा तीन जिल्ह्यांच्या ४१८ केंद्रांवर होणार आहे. इयत्ता बारावीची बोर्ड परीक्षा तीन जिल्ह्यांतून ९६ हजार ४९६ विद्यार्थी देणार आहेत. कॉपी करून विद्यार्थी पार करणाऱ्या रॅकेटला यामुळे पायबंद बसणार आहे. दहावी, बारावी बोर्ड परीक्षेवेळी होणारा कॉपी प्रकार थांबायचे नाव घेत नसल्याने राज्य सरकारने आणखी एक फंडा आणला, तो म्हणजे लातूर विभागीय परीक्षा मंडळाने दहावी (केंद्र ४१८) व बारा

## उड्डाणपुलावरुन पडून एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपुलावरूनपडल्याने एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली आहे. शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास एका चाळीस वर्षीय व्यक्तीने उड्डाणपुलावरुन उडी घेत आत्महत्या केली.उंचावरुन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. डोक्याला, पायाला, छातीला मार लागला होता. चौकातील नागरिकांनी त्यास उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले होते. मात्र, गंभीररित्या जखमी झाल्याने सदरील व्यक्तीचा उपचारासाठी दाखल होताच मृत्यू झाला. मयताची ओळख रात्री उशिरापर्यंत पटलेली नव्हती. शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पो. हे. रामराव जाधव हे करीत आहेत.

## महाराष्ट्र महाविद्यालयात विद्यार्थिनी व्याख्यानमाला संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २४ जानेवारी :** सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ साहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील महाराष्ट्र महाविद्यालयात विशेष विद्यार्थिनी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचा विषय सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ: जीवनपट असा होता. यात २० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

प्रत्येक विद्यार्थिनीने विषयाचा अनुषंगाने अभ्यास करून आपली मते मांडली, व दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी आजच्या काळातील त्यांच्या कार्याची प्रस्तुतता विषद करून त्यांच्याकडून तरुणींनी कोणती प्रेरणा घ्यायला हवी हे सांगितले. व्याख्यान सादर करणाऱ्या सर्वोत्कृष्ट व्याख्यात्या विद्यार्थिनीला या प्रसंगी सन्मानित करण्यात आले. यात गुणानुक्रमे प्रथम कु. प्रणिता तांबाळे, द्वितीय कु. सोमवंशी मोनिका आणि तृतीय कु. आलिया सुमय्या तर उत्तेजनार्थ कु. मुळे अंकिता यांनी स्थान पटकावले.

यावेळी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. कदम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी.एस.चौधरी, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. मनीषा घोगरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.डी.एस.चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## गुरू तेगबहादूर यांच्या जीवन कार्याचा सर्वांनी बोध घ्यावा : ॲड. बेंडकुळे



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** शीख धर्माचे ९ वे गुरू श्री गुरू तेगबहादुर यांनी आपल्या आयुष्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी धर्मासाठी केलेले कार्य प्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचा सर्वांनी बोध घ्यावा, असे मत अँड किशनराव बेंडकुळे यांनी व्यक्त केले.

श्री तेगबहादुर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने शासनाच्या परिपत्रकानुसार हिंद-की-चादर श्री गुरू तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागम शताब्दी वर्षा निमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला धर्मप्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचे स्मरण होण्याकरिता त्यांच्या जीवन चरित्रावरील डॉक्युमेंट्री दाखविणे, वक्तृत्व स्पर्धा, गटचर्चा, जनजागृती, प्रभात फेरी, निबंध लेखण, चित्रकला, व्याख्यान अशा विविध स्पर्धा व कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रा डॉ प्रकाश देशमुख यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्री गुरु तेगबहादूर यांच्या कार्यावर यथोचित प्रकाश टाकला व त्यांच्या कार्याचा बोध सर्वांनी घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रकाश देशमुख यांनी गुरू तेगबहादूर यांच्या कार्याचा परिचय करून दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ बालाजी पाटील डॉ यादव सूर्यवंशी प्रा. प्रकाश डवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ बालाजी पाटील यांनी केले आभार नागेश पवार यांनी मानले.

## अरविंद सोनवणे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरविंद माणिकराव सोनवणे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. २३) सकाळी ८.५० च्या सुमारास शहरातील एका खाजगी रूग्णालयात निधन झाले. त्यांच्यापश्र्चातदोनमुले,एकमुलगी,असापरिवारआहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. अरविंद सोनवणे ते २००५ दरम्यान, लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, वाले इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष, व्यापारी धर्मशाळेचे अध्यक्ष, सिद्धेश्र्वर देवस्थानचे सदस्य, गोरक्षण संस्थेचे सदस्य, अडत व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष, राष्ट्रीय गुमास्ता मंडळाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सातत्याने वावर होता. वेगळे, नवीन काही तरी करण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## हरिकिशन लोया यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २४ जानेवारी :** चाकूर येथील प्रतिष्ठित व्यापारी हरिकिशन मोतीलाल लोया यांचे वयाच्या ८० व्या वर्षी लातूर येथील खाजगी रूग्णालयात गुरूवारी दिनाक २२ जानेवारी रोजी उपचारा दरम्यान दुखद निधन झाले.त्यांच्यावर चाकूर येथील मारवाडी स्मशानभुमी येथे शुक्रवारी दिनांक २३ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी शंकुतलाबाई,तीन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते पत्रकार ओम लोया यांचे वडील होते. अंत्यसंस्कारास चाकूर शहर आणि परिसरातील नागरिक,नातेवाईक,मित्रमंडळी उपस्थित होते.



## रेणापूरच्या आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २४ जानेवारी :** येथील रूपचंद नगर मधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे उद्घाटन रेणापूरचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व स्वर्गीय कै. मिठाराम रूपचंद राठोड यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई मिठाराम राठोड या होत्या. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक देडे यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण ,कलागुण विकसित पूर्ण शिक्षण मिळणे महत्वाचे असल्याचे सांगितले. या आश्रमशाळेच्या माध्यमातून रेणापूरच्या विद्यार्थ्यांना अत्यंत दर्जेदार शिक्षण आणि शिक्षण विषयक सुविधा पुरविल्या जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य प्रदीप राठोड यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधताना विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीगणेश वंदनाच्या नृत्याने करण्यात आली. कार्यक्रमात शालेय विद्यार्थांनी विविध हिंदी, मराठी,भारुड, देशभक्ती गाण्यावर नृत्य सादर केले व त्यानंतर नाटकाचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख राठोड बी. एन. सौ. सुरेखा मॅडम, सौ. चव्हाण मॅडम, तुरुप मॅडम, बोने, मालुसरे,चव्हाण, कासले, वडवले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक लव्हेकर यांनी केले तर आभार प्रा. खाडप यांनी मानले. यावेळी सर्व विद्यार्थी - पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदपुरात मन्मथ स्वामी जन्मोत्सव सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** वीरशैवांचे महान संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा वीरमठ संस्थांन अहमदपूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही मन्मथ स्वामी यांच्या जयंती उत्सवानिमित्त शिभप संतोषी मिटकरी अंधोरीकर यांचे कीर्तनाचा कार्यक्रम झाला. यावेळी आचार्य गुरुराज स्वामी महाराज आशिर्वचनात म्हणाले, मन्मथ माऊली यांनी वीरशैव लिंगायत धर्मात कीर्तन, प्रवचन, करत परंपरेचे पुनर्जीवन केले. १६ व्या शतकात त्यांनी केलेले महान कार्य पुढे विसाव्या शतकात राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी पुढे चालवले. या महान विभूतींचा जन्मोत्सव आपण सर्वांनी साजरा केलात, त्यांचे विचार आचार आत्मसात करणे गरजेचे आहे. तसेच परमरहस्य ग्रंथाचे पठण करुन त्याचे आचरण करणे तितकेच गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'जागृती' च्या ७,२१,००१ साखर ५० किलोचे पोत्याचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २४ जानेवारी :** राज्यातील खाजगी साखर कारखान दारीत नावलौकिक असलेल्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिजच्या २०२५-२६ च्या चालू गळीत हंगामात ३ लाख ६३ हजार ४६० मे.टन ऊसाचे गाळप करुन ११.५७ उताऱ्यासह १ कोटी ६ लाख ८४ हजार ८०० युनिट विज निर्यात केली आहे. उत्पादीत केलेल्या ७ लाख २१ हजार १ साखर पोत्याचे पूजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा साखर काखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, राम भंडारे, धनाजी कोटे, जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेती अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, आसवणी प्रमुख विलास पाटील, फायनान्स अधिकारी ए.व्ही.सुर्यवंशी, उपमुख्य अभियंता अक्षय सुर्यवंशी, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार, चिफ अकौटंट सर्जेराव पाटील जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते.



## मांजरा महिला अर्बन को -ऑप. सोसायटीत हळदी -कुंकू समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** मकर संक्रांती निमित्त मांजरा महिला अर्बन कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कार्यालयात २४ जानेवारी रोजी महिलांसाठी हळदी -कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या सोसायटीच्या चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्त्यां, उद्योजक प्रियांका सुरवसे आणि त्यांच्या महिला कर्मचाऱ्यांनी सर्व महिलांचे कुंकू लावून आणि वाणाची स्नेहभेट देऊन स्वागत केले. त्यानंतर जमलेल्या प्रत्येक महिलांनी उखाणे घेतले. उखान्याचा कार्यक्रम चांगलाच रंगला. उपस्थित महिलांसाठी स्वादिष्ट अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. हळदी कुंकूवा निमित्त मांजरा महिला क्रेडिट सोसायटीतर्फे १३ महिन्याच्या ठेवीवर १२ टक्के व्याजदर देण्यात येणार आहे. या संधीचा महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन चेअरमन प्रियांका सुरवसे यांनी यावेळी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या चेअरमन प्रियांका सुरवसे, सचिव रोहिणी धायगुडे, व्यवस्थापक आदर्श कांबळे आणि कर्मचारी, अभिजीत कांबळे, सोहेल पठाण, सुरज उदारे, दुर्गेश डूमने, ऐश्र्वर्या पाटील, धनश्री अडसूळ, अनिता गोडपटले व इतर कर्मचारी महिलांनी परिश्रम घेतले.

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलमध्ये मकरसंक्रातीच्या निमित्ताने हळदी-कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ जानेवारी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मध्ये मकरसंक्रातीच्या सणाचे औचित्य साधुन हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ.शिल्पाताई भुसारी तर प्रमुख अतिथी म्हणून सौ.सोनाली पोखरकर व प्रमुख पाहुणे म्हणून सौ.रंजना भुसारी तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सौ.सुषमा गुजर,सौ.प्रियंका थळकरी, सौ.सुप्रिया पाटू, सौ.वैभवी शिनगारे या उपस्थित होत्या यावेळी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले.



यावेळी उपस्थित महिलांसाठी संगीत खुर्ची व तळयात-मळ्यात,उखाणे या स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धेमधील सौ.नम्रता मुळे,सौ.पुजा चौधरी,सौ.रोहिणी जाध,सा ै.जयश्री दोडके,सौ.सुप्रिया मुकदम, सौ.वैशाली मोरे या विजेत्या महिलांना सचिन कलेक्शन व इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल तर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पैठणी साड्या व शाळेची दिनदर्शिका भेट म्हणुन देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व महिलांना हळदी कुंकू लावून तिळगुळ देऊन वाण म्हणून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलची दिनदर्शिका देण्यात आली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.बापुसाहेब भुसारी,सर्व इरा स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.साक्षी खंडेलवाल यांनी तर प्रास्ताविक सौ.ज्योती वैरागे यांनी केले.




बीड शहरातील विविध प्रश्नावरती विविध प्रश्नावरती मुख्याधिकारी शैलेश फणसे साहेब यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली यावेळी मुख्याधिकारी साहेब यांनी विविध प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिलेले आहे नगरसेवक गोविंद नवनाथ शिराळे पाटील इत्यादी यामध्ये वॉर्ड नंबर २५ मधील नाल्याचा प्रश्न पिण्याचे पाण्याचा प्रश्न विद्युत लाईटचा प्रश्न स्वच्छता व आरोग्य याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम मधील लाईटचा प्रश्न यासह बीड शहरातील अनेक बाबतीत सखोल साधक वादक चर्चा करण्यात आली सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्याधिकारी शैलेश फणसे साहेब व. गोविंद नवनाथ शिराळे पाटील सदस्य नगरपरिषद बीड

## उल्लेखनीय कामगिरी

# पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांना विशेष पोलीस महानिरीक्षकांचे प्रशस्तीपत्र

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ जानेवारी**

माजलगाव शहर येथे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी सन २०२५ मध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या प्रभावी व धाडसी कारवाईबद्दल त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

माजलगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीत समाजविघातक गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी अत्यंत गांभीर्याने लक्ष केंद्रित केले. अशा गुन्हेगारांचे रेकॉर्ड सखोलपणे पडताळून त्यांच्यावर कठोर प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी एकूण चार गुन्हेगारांविरोधात सक्षम व भक्कम प्रस्ताव तयार करण्यात आले. या प्रस्तावांचा योग्य पाठपुरावा करून ते विहित कालावधीत सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले व



त्यांना मंजुरी मिळवून देण्यात आली.

प्रस्ताव मंजूर होताच संबंधित गुन्हेगारांना ताब्यात घेऊन मध्यवर्ती कारागृह, हर्सल (छत्रपती संभाजीनगर) येथे स्थानबद्ध करण्यात आले. या प्रभावी कारवाईमुळे माजलगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास मोठी मदत झाली असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या कार्यतत्परता, दूरदृष्टी, कायदेशीर ज्ञान व उत्कृष्ट प्रशासकीय कौशल्याचे उत्तम उदाहरण असल्याचे प्रशस्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र (भा.पो.से) यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करत, भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट कार्य करून बीड जिल्हा पोलीस दलाचे नावलौकिक वाढवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# प्राथमिक निवासी आश्रम शाळा, टाकळी येथे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ जानेवारी**

टाकळी प्राथमिक निवासी आश्रम शाळा, टाकळी येथे थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती



उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती घुले काशीबाई नारायण राव होत्या.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. घुले सर यांच्यासह श्री. घुले श्रीकांत सर व श्री. आठरे सर,श्री.डोईफोडे सर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी नेताजींच्या देशभक्ती, शौर्य व त्यागमय जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.विद्यार्थ्यांनीही आपल्या पद्धतीने नेताजी बद्दल भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बारगजे सर यांनी केले, तर आभारप्रदर्शन चौरे सर यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले धारूर आगारात घुमला चालकांच्या कर्तृत्वाचा जागर!

## सुरक्षित प्रवासाचे 'सारथी' सन्मानित; धारूर आगारात चालक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२४ जानेवारी**

प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलणाऱ्या एसटी चालकांचा गौरव करण्यासाठी, किल्ले धारूर आगारामध्ये 'चालक दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित सत्कार सोहळ्यात आगारातील कर्तव्यदक्ष चालकांचा शाल, श्रीफळ आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

चालक हेच समाजाचे खरे नायक : आगार प्रमुख चौरे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आगार प्रमुख श्री. चौरे साहेब यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी चालकांच्या कामाचे महत्त्व अधोरेखित केले. अहोरात्र, ऊन-पावसाची पर्वा न करता प्रवाशांना सुरक्षित स्थळी पोहोचवणारे चालक हे खऱ्या अर्थाने समाजाचे नायक आहेत, अशा शब्दांत त्यांनी चालकांचे कौतुक केले.

पत्रकार जगताप याच्याकडून सेवेचे कौतुक

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार जगताप उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात चालकांच्या निस्वार्थ आणि सेवाभावी वृत्तीचा गौरव केला. धकाधकीच्या जीवनात चालक अत्यंत संयमाने आपली भूमिका पार पाडतात, त्यांच्या या कार्याची दखल घेणे हे समाजाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

आदर्श चालकांचा झाला सन्मान

यावेळी सुरक्षित सेवा देणारे आदर्श चालक म्हणून नरहरी सारुक आणि अजिनाथ गायकवाड यांचा विशेष प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर मोहन बिक्कड, तुकाराम मुळे, पठाण, गुजर, आप्पासाहेब कापरे, माणिक भालेकर, राजेभाऊ घुले, धनराज चाटे, चोले, सोनवणे, घोळवे या चालकांचाही मान्यवरांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी बिक्कड यांनी अत्यंत खुबीने केले. या सोहळ्याला विलास शिंदे, कदम साहेब, नागरगोजे साहेब, संघटनेचे अध्यक्ष डी.बी. मुंडे, अजय सोनटक्के, आढागळे, इम्रान कादरी, नामदेव तिडके, लोंढे, लाकूळ, सरवदे, सोनवणे मॅडम, केंद्रे मॅडम, मनियार यांच्यासह आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी कै. सुभाष अण्णा सोनटक्के प्रतिष्ठान यांच्या वतीने सर्व उपस्थितांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साही वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

# कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात माता पालकांचा हळदी कुंकू व उद्बोधनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात माता पालकांचा हळदी कुंकू व उद्बोधनाच्या कार्यक्रमा साठी व्यासपीठावर मा. सौ.ज्योती भाभी ठाकूर (उपाध्यक्षा भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई), मा.श्री प्रदीपजी जोशी सर (मुख्याध्यापक कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालय,अंबड) मा. श्री. सुधाकर घायतडक सर (मुख्याध्यापक कै. दत्ताजी भाले माध्यमिक विद्यालय अंबड) तसेच सौ.नीता टिंगळे (माता पालक संघ सदस्य) उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर मा. श्री प्रदिपजी जोशी सर यांनी त्यांच्या प्रास्ताविकात भारतीय संस्कृती, नियोजन पुस्तिका, पंच परिवर्तन व मराठी शाळा ,याविषयी माता पालकांना मार्गदर्शन केले. तसेच ज्योतीभाभी ठाकूर यांनी शाळेतील मुलांवरील संस्कार, आईची भूमिका , विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी स्व संरक्षणासाठीचे धडे कसे आवश्यक आहे याविषयी मार्गदर्शन केले. तसेच माता पालकांनी तयार करून



आणलेल्या शैक्षणिक साहित्याचे कौतुक व अभिनंदन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने माता पालकांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात एकूण ४५ माता पालकांनी सहभाग घेतला. त्यापैकी माता पालकांचे तीन क्रमांक काढण्यात आले. सौ. शिवकन्या रमेश देशपांडे-प्रथम क्रमांक सौ. शारदा मुकेश गिरी- द्वितीय क्रमांक, सौ. सावित्रा तानाजी तळेकर- तृतीय क्रमांक या माता पालकांना २६ जानेवारी रोजी बक्षीस देऊन कौतुक व अभिनंदन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी एकूण १७० माता पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनुराधा भाकरे मॅडम तर ऋणनिर्देश श्रीमती रिता मुगटकर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक विभागाच्या माता पालक संघ प्रमुख सौ.रागिणी जोशी मॅडम माध्यमिक विभागाच्या माता पालक प्रमुख श्रीमती निशा जपे मॅडम, श्रीमती सुवर्णलता खानापूरकर, श्रीमती प्रतिभा आजबे, श्रीमती आम्रपाली बोराळे, श्रीमती रेखा देशमुख, श्रीमती मेघा वायकोस ,श्रीमती प्रणिता वाघमारे, श्रीमती कल्पना बनसोडे, श्रीमती स्वाती बारहाते यांनी प्रयत्न केले.

# स्वत:ला सिध्द करणेसाठी मेहनत व प्रामाणिक पणा श्रेष्ठ-प्रा.चंद्रकांत मुळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

भाशिप्र संस्था संचलित स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय बीड मध्ये एच एच सी (१२ वी) फ्रेबु २०२६परिक्षा स प्रविष्ट विद्यार्था ना शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या



कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा चंद्रकांत मुळे संस्था प्रशासकीय समन्वयक,उमेश जगताप विद्यासभा उपाध्यक्ष, प्रमोदराव कुलकर्णी शालेय समिति अध्यक्ष ,प्राचार्य विठल काळे डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर उपप्राचार्य. प्रा बाळासाहेब साळवे विभाग प्रमुख. डॉ दीपक देशमुख मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य विठ्ठल काळे यानी विद्यार्थांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या . भविष्यातील जग वेगळे आहे विविध घटनाशी तुमच्या जीवनात संबंध आहे . विविध उदाहरणासह जीवनात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्याचे देवून तुम्हा सर्वांना शुभेच्छा.प्रमोदराव कुलकर्णी यांनी शुभेच्छा दिल्या जीवनात यशस्वी व्हा अध्यक्षीय समारोप करताना प्रा चंद्रकांत मुळे याती मार्गदर्शन करताना सांगितले की १२वी नतंर विविध संधी चे क्षेत्र आहेत प्रामाणिक पणे परिशेस सामोरे जा आई वडील यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा जीवनात आईवडील ,संस्था शिक्षक, यांचे नाव उज्वल करा तुम्ही जे ध्येय मनात ठरवले ते पूर्ण करा मेहनतीचे यश निश्चीत मिळते . जीवनात सर्वच दिवस महत्वाचे आहे.नवीन शिक्षण धोरणात तुम्हास विविध विषयाचा अभ्यास करण्याची संधी आहे . विद्यार्थानो स्वतःला सिध्द करणेसाठी मेहनत व प्रामाणिक पणा श्रेष्ठ आहे . अभ्यास करून परिक्षा द्या व यश मिळवा त्याचा समाजास उपयोग करा . उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाण कर प्रा दीपक देशमुख प्रा बाळासाहेब साळवे यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना परिक्षेस शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यालयात आयोजित विविध स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाण पत्र मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.आकाश महाजन अदिती वाघमारे गायत्री घुमरे सिद्धी परसे या विद्यार्थ्यानी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा दीपाली लोहिया ,सुत्रसंचलन प्रा संतोष जोशी आभार प्रदर्शन प्रा रत्नमाला सोनवणे केले.

# जयभवानीत उद्योजकता विकास या विषयावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२४ जानेवारी**

युवकानी नौकरीच्या मागे न लागता स्वत:चे उद्योग व्यवसाय सुरू करावेत.उद्योग व्यवसायाकडे वळावे!असे प्रतिपादन बीड जिल्ह्यातील युवा उद्योजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक चे जिल्हाध्यक्ष श्री बळीराम गवते यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर व महाविद्यालयातील व्यवसाय मार्गदर्शन कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास एक दिवसीय कार्यशाळेत बीज भाषक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की स्पर्धेच्या युगात सर्वानाच नौकऱ्या मिळतीलच याची शाश्वती नाही.आधुनिक काळात अनेक क्षेत्रात नवनविन क्षेत्रात उद्योग, व्यावसायाच्या संधी आहेत.आवडत्या क्षेत्रात व्यसनापासून दूर राहुन



उद्योग,व्यवसाय करावेत सर्व बाबीत मदत व मार्गदर्शन करु!असे अश्वासन दिले.या कार्यशाळेचे उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर हे होते.तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर सुप्रसिध्द शिवव्याख्याते शिवश्री.डॉ. बाळासाहेब पिंगळे,प्राचार्य डॉ.दत्ता ढास,प्रा.डॉ.मनोजकुमार नवसे,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक,प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती.उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम कदम यांनी उदघाटकीय भाषणात या कार्यशाळेचा हेतु सांगुन.विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे अहवान केले.या कार्यशाळेत प्रथम सत्रात कौशल्य विकास या विषयावर प्रा. डॉ.मनोजकुमार नवसे,तर द्वितीय सत्रात अर्थिक व्यवस्थापन या विषयावर प्राचार्य डॉ.दत्ता ढास यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.या कार्यशाळेचे संचलन प्रा.डॉ.शिवाजीराव काकडे,यांनी केले तर प्रस्ताविक व आभार या विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ.श्रीमती कल्पना घारगे यांनी केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# डोकेवाडा येथे अंगणवाडी इमारत बांधकामाचे भूमिपूजन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते संपन्न!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

आज लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोकेवाडा गावात लहान बालकांच्या शिक्षण, पोषण आणि संस्कारासाठी अत्यावश्यक असलेल्या नव्या अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते व हभप तुकाराम महाराज, हभप मोहन बाबा कदम महाराज, सरपंच बाप्पासाहेब कदम, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी फेडरेशन संचालक बद्रीनाथ जटाळ, सुग्रीव डोके,डोके बाबुराव मुकादम, माजी सरपंच ईश्वर वाळेकर, सदस्य देविदास वाघ,डोके किसन



सौदागर, चंद्रसेन जाधव,आसाराम डोके, अनिल अनपट, सस्ते आपाराव, बबनराव सस्ते, रमेश डोके ,शंकर डोके, किसनराव कदम, महादेव डोके, विलास कदम बजरंग डोके, युवराज कदम, सोमीनाथ डोके, श्रीराम कदम, लक्ष्मण डोके अभिमान डोके, रत्नाकर डोके ,रमेश डोके, राजेभाऊ डोके ,शिवाजी तुपे, भास्कर कदम, उपसरपंच बबलू भांडवलकर, सचिन मस्के, सतीश कळसुले अंकुश सस्ते, अरुण वाळेकर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के म्हणाले -गावाचा खरा विकास म्हणजे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी,लाईट आणि रस्ते यांचा समतोल विकास. ग्रामीण भागातअंगणवाडी ही मुलांच्या उज्वल भविष्यासाठीची पहिली शाळा आहे. या इमारतीमुळे डोकेवाडा गावात बालकांच्या भरण-पोषणा बरोबरच शिक्षण, बालसंस्काराची भक्कम पायाभरणी होईल. लिंबागणेश गटातील प्रत्येक गाव खेड्याला पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**नळदुर्ग, दि.२३ जानेवारी -**

नळदुर्ग येथे दि.२३ जानेवारी रोजी शहर शिवसेनेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमारे व श्री गवळी यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर शिवसेनाप्रमुख संतोष पुदाले, उपतालुकाप्रमुख सरदारसिंग ठाकुर, उपशहर प्रमुख शाम कनकधर यांच्यासह बसवराज जमादार, बाबासाहेब कटके, प्रमोद कोकणे, सोमनाथ म्हेत्रे, चंदू सगरे, ओमकार कलशेट्टी, दशरथ ठाकुर, लक्ष्मण अंगुळे, रवी गायकवाड आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विशाल जाधव यांची मुंबई कारागृह पोलीसपदी निवड

**इटकळ, दि.२३ जानेवारी -**



तुळजापूर तालुक्यातील मौजे शिरगापूर येथील शेतकरी पुत्र विशाल शिवाजी जाधव यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत वडिलांचे पोलीस होण्याचे स्वप्न पूर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिद्द, चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास आणि सातत्य यांच्या जोरावर अशक्यही शक्य होते, हे विशाल जाधव यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे. विशाल शिवाजी जाधव यांची मुंबई कारागृह येथे पोलीस पदी निवड झाल्याने शिरगापूर गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.



### 'जवाहर'मध्ये कॉपीमुक्त शपथ

**अणदूर, दि.२३ जानेवारी -**

जवाहर विद्यालय, अणदूर येथे (दि.२२ जानेवारी) इ.१० वी विद्यार्थ्यांना परीक्षेस गैरहजर राहणार नाही व परीक्षेत कॉपी करणार नाही याची शपथ देण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यालयातील सुभाष गळाकाटे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेस गैरहजर राहणार नाही, परीक्षेत कॉपी करणार नाही, अशी सामुदायिक शपथ दिली,परीक्षा पध्दतीमध्ये झालेल्या आमुलाग्र बदलाची माहिती दिली. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, परीक्षार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

### रमणलाल शहा यांचे निधन

**परंडा, दि.२३ जानेवारी -**



परंडा येथील प्रतिष्ठित नागरिक, सर्वपरिचित कौटुंबिक स्नेही, ज्येष्ठ कापड व्यापारी तसेच श्री जैन मंदिराचे माजी उपाध्यक्ष रमणलाल बन्सीलाल शहा यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि.२१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.३६ वाजता निधन झाले. ते कापड व्यापारी सुयोग शहा यांचे काका होत. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार असा मोठा परिवार आहे.

### विजयकुमार यादगिरे यांचे निधन

**नळदुर्ग, दि.२३ जानेवारी -**



मराठवाडा मुक्ती संग्राम आंदोलनातील स्वातंत्र्यसैनिक स्व. बाबुराव यादगिरे यांचे जेष्ठ चिरंजीव तसेच नळदुर्ग येथील विविध वृत्तपत्रांचे एजंट भारत यादगिरे यांचे जेष्ठ बंधू, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक विजयकुमार यादगिरे यांचे शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास निधन झाले. विजयकुमार यादगिरे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर सोलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, भाऊ, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### शेळगाव गटात भाजपाचे शक्तीप्रदर्शन

**परंडा, दि.२३ जानेवारी -**

परंडा तालुक्यातील जि.प. शेळगाव गटातून प्रथमच भाजपाचे जोरदार शक्तीप्रदर्शन करीत उमेदवार शरद पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाने ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढण्याची तयारी केली असून शेळगाव गटात प्रस्थापितांसमोर पवार यांनी कडवे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणल्याचे चित्र दिसून येत आहे.

# धाराशिवात सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

आज छत्रपती शिवाजी हायस्कूल, धाराशिव येथे सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांची तसेच शेतकरी नेते उद्धवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात झाली. यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन झाले व उपस्थितांनी मतदार म्हणून सामूहिक शपथ घेतली.

विद्यार्थ्यांसाठी प्रा. रवि सुरवसे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, चित्रपटातील हिरो पैसे कमावतात; पण देशासाठी संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे महापुरुष हे खरे सुपरहिरो आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकत जीवनातील यशस्वी होण्यासाठी प्रेरणा दिली.

शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे यांनी राष्ट्रीय मतदार दिवस व भारतीय संविधानाच्या अमृतम होत्सवी वर्षाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच मतदार हा राज्यघटनेने दिलेला मौलिक अधिकार असून प्रत्येक मताची किंमत अनमोल असल्याचे अधोरेखित केले.

गट शिक्षणाधिकारी असरार पठाण यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मतदार दिनाचे महत्त्व पटवून देत लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व सांगितले.



यानंतर मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली, ज्यास गट शिक्षणाधिकारी असरार पठाण व एम.डी. देशमुख यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

कार्यक्रमास मतदार जनजागरण समितीचे सदस्य, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक आनंद वीर यांनी केले तर आभार प्राचार्य पाटील यांनी मानले.

## कानेगाव जि.प.साठी निता अनिल जगताप यांचा अपक्ष लढा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

कानेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार सौ. निता अनिल जगताप यांच्यासाठी शेतकरी नेते अनिल जगताप यांनी झंझावती दौऱ्याला सुरुवात केली असून उंडरगावमध्ये शेतकरी व नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या.

महाविकास आघाडीने उमेदवारी नाकारल्यानंतर अनिल जगताप यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला असून, मतदारसंघात त्यांच्या प्रति प्रचंड सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

धाराशिव जिल्हा, लोहारा-उमरगा तालुक्यांना शेकडो कोटींचे पिक विमा व अतिवृष्टी अनुदान मिळवून देणारे शेतकरी नेता अनिल जगताप यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने एबी फॉर्म दिला नाही. ४० वर्षे निष्ठापूर्वक पक्षाचे काम केले असतानाही फॉर्म न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष लढण्याचा मार्ग निवडला आहे.

अनिल जगताप यांनी सन २०२४ मध्ये ८० हजार शेतकऱ्यांसाठी ८६ कोटी ४६ लाख ३४ हजार रुपये अतिवृष्टी अनुदान मिळवून दिले. तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आंदोलनांमध्ये पुढाकार घेतला आहे.

कानेगाव मतदार संघात एकूण २३,५४४ मतदान आहेत आणि प्रत्येक गावात अनिल जगताप यांना भक्कम पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या समाजकारणावर भर असल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने त्यांच्याकडे आकर्षित झाला आहे.

त्यांना अधिकृत चिन्ह २७ तारखेला मिळणार असून, त्यानंतर ते घरोघरी जाऊन प्रचार करणार आहेत.

## जिल्हास्तरीय आश्रम शाळा क्रीडा स्पर्धा यमगरवाडीतील विद्यार्थ्यांचे यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण आयोजित धाराशिव जिल्हा आश्रमशाळा क्रीडा महोत्सव सन २०२५-२०२६ या क्रीडा स्पर्धा शिंगोली आश्रम शाळा धाराशिव येथे नुकत्याच रोजी पडल्या स्पर्धेमध्ये आपल्या एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम कामगिरी करून यश संपादन केले.

एकलव्य विद्या संकुलातील खेळाडूंनी १७ वर्षे वयोगट मुलांच्या कबड्डी संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. १४ वर्षे वयोगट मुला मुलींमध्ये लांब उडी मानसी मोहिते प्रथम क्रमांक, अबोली माने तृतीय क्रमांक, १०० मीटर धावणे अबोली माने प्रथम क्रमांक, ओमकार गंदेवाड-प्रथम क्रमांक,२०० मीटर धावणे विश्वजीत जाधव प्रथम क्रमांका असे क्रमांक मिळवणे संपादन केले. विजय सर्व खेळाडूंचा इतर मागासवर्ग प्रादेशिक उपसंचालक लातूर तेजस माळवतकर व इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहायक संचालक अमोल ताकभाते यांच्या हस्ते सामाजिक न्याय भवन धाराशिव येथे सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला खेळाडू तसेच लातूर प्रादेशिक कार्यालयातील सचिन नटवे, विकास राठोड, व्याख्याते डॉ. भैरवनाथ कानडे, विठ्ठल म्हेत्रे, माऊली भुतेकर, रमाकांत पवार, यशवंत निंबाळकर, माऊली भुतेकर, तात्याराव चव्हाण, अनिल खताळ, शिंदे, माजी मुख्याध्यापक जगताप दादा, दयानंद राठोड व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### शेत गटांतील विद्युत मापकाचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

घाटनांदुर शिवारातील शेत गट नं. ६८०, ६५१ व ८४३ येथे ४ पोलीवरील विद्युत मापक स्काडा केबल अज्ञात व्यक्तीने तोडले. यामुळे कंपनीला अंदाजे ३,०६,५४९ चे नुकसान झाले.

फिर्यादी अमोल आश्रुबा मोटे (वय ४१, रा. गिरवली, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दि.२२ जानेवारी रोजी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वाशी : भाजपच्या सर्व जागेवर उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२३ जानेवारी -**



वाशी तालुक्यातील पारगाव, पारा आणि तेरखेडा या तीन गटांतून पंचायत समितीच्या सहा गणांसाठी उमेदवारांची नोंदणी सुरु आहे. भारतीय जनता पक्षाने (भाजप) प्रत्येक गटात आपले उमेदवार अर्ज दाखल केले आहेत.

पारगाव गट : आखाडे आशा महादेव, कोकणे लक्ष्मी सुशांत, सरमकुंडी गट : क्षीरसागर नयना विश्वास, ठाकूर प्रिया प्रदीप सिंह, पारा गट : लोकरे रूपाली सुजित, लोकरे संगीता महादेव, भराटे दादाराव रामभाऊ, बावी गट : शिंदे संजय मच्छिंद्र, इंदापूर गट : घोडके सुवर्णा संदीपान तेरखेडा गट : घुले प्रवीण बिबीशन, पाटील उज्वला आनंद, घुले मोहिनी प्रवीण यांनी अर्ज भरला आहे.

भाजप तालुकाध्यक्ष राजगुरू कुकडे यांनी सांगितले की, जर युती झाली तर युतीतून लढा देता येईल, अन्यथा भाजप सर्व गटातून स्वतंत्र उमेदवार मैदानात ठेवण्यास तयार आहे. त्यामुळे प्रत्येक गटात आणि गणात तणावपूर्ण पंचरंगी सामना होण्याची शक्यता आहे.

## नेताजी हे स्वतंत्र संग्रामाचे महानायक : व्यंकट वचने

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ जानेवारी -**

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी सेनापती म्हणून अत्यंत महत्त्वाची व निर्णय भूमिका बजावली. त्यामुळे आपला देश स्वतंत्र झाला. त्यांच्या धाडसी वृत्तीमुळे इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले होते. त्यामुळे त्यांची दखल घेऊन इंग्रजांची पळता भुई थोडी झाली होती, असे प्रतिपादन व्यंकट वचने यांनी केले.

स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये महानायक नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून वचने बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सविता लोहार या होत्या.



याप्रसंगी विवेक जाधव, नागनाथ तांबुळे, बेबी सरोजा पवार, महेश कुलकर्णी, अविनाश जोशी आदीसह विद्यार्थी उपस्थित होते. पुढे बोलताना वचने म्हणाले की, इंग्रजांच्या जुलमी राजवटीच्या विरुद्ध अत्यंत धाडसाचे काम नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी केले.

अशा महामानवाचे जयंती साजरी करत असताना आजच्या विद्यार्थ्यांनी अशा व्यक्तिमत्त्वापासून बोध घेऊन आपल्या जीवन कार्यामध्ये त्यांचं आचरण करावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विवेक जाधव यांनी मानले.

### तामलवाडी येथे इंडस टॉवरच्या फायबरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

तामलवाडी येथे एअरटेलचे फायबर अंदाजे ४०,००० रूपये किमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरी केले.

फिर्यादी महादेव पंडीत ढवण (वय ४२, रा. खंडाळा, ता. तुळजापूर) यांनी दि. २२ जानेवारी रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात प्रथम तक्रार दिल्यानंतर, पोलीस ठाण्यात भारतीय दंडसंहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या विचारांची प्रेरणा घेण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे : महंत जितेंद्र महाराज

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

सर्व समाजासाठी बलिदान देणारे हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास अबाधित राहावा, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून नांदेड येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाला जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पोहरादेवी येथील धर्मपीठाचे महंत जितेंद्र महाराज यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज हिंद दी चादर गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीत महंत जितेंद्र महाराज बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महंत जितेंद्र महाराज म्हणाले की, गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा गौरवशाली इतिहास येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. नांदेड येथे होणारा कार्यक्रम हा जागतिक स्तरावरील असून देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक व अनुयायी सहभागी होत आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी सांगितले की, गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्यात त्या काळात विविध समाजांचे लोक सहभागी होते. दानशूर व्यक्ती व प्रशासनाच्या समन्वयातून नागरिकांसाठी वाहन व्यवस्थेचे नियोजन करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या बैठकीस हिंद दी चादर क्षेत्रीय आयोजन समितीचे संतोष चव्हाण, ॲड. प्रवीण पवार, विलास राठोड, विद्यानंद राठोड, दिनेश चव्हाण, शिवाजी राठोड, बाळासाहेब पवार, वसंत पवार, लक्ष्मण राठोड, राहुल राठोड, विनायक राठोड, ज्ञानदेव राठोड, दामाजी राठोड, बी.बी. राठोड, नितीन पवार, नितीन राठोड, गुरुनाथ राठोड व दिनेश राठोड यांची उपस्थिती होती.

## वाशी तालुक्यातील पहिले देहदान... कै. मनीषा निरगुडे यांचा समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील सहावे तर वाशी तालुक्यातील पहिले देहदान मंगळवार, दि. २१ जानेवारी रोजी घडून आले असून, या घटनेने समाजासमोर वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी व मानवतेचा आदर्श उभा केला आहे. अंधश्रद्धा व रूढी-परंपरांना छेद देत देहदानाचा प्रेरणादायी निर्णय घेणाऱ्या कै. मनीषा पंडित निरगुडे (वय ४६, रा. पिंपळगाव - लिंगी, ता. वाशी) यांनी मृत्यूनंतरही समाजासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच धाराशिव जिल्हा संप्रदाय यांच्या माध्यमातून कै. मनीषा निरगुडे यांनी आपल्या हयातीतच देहदानाचा ठाम संकल्प केला होता. अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. मात्र, निधनापूर्वी काही दिवस त्यांनी आपल्या कुटुंबीयांकडे देहदानाची स्पष्ट इच्छा व्यक्त केली होती.

त्यांच्या या इच्छेचा सन्मान राखत पती पंडित निरगुडे, मुलगी व इतर नातेवाईकांच्या संमतीने त्यांचे पार्थिव धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करण्यात आले. या देहदानामुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच संशोधन क्षेत्राला मोलाची मदत होणार आहे.

निधनाची माहिती मिळताच धाराशिव जिल्हा संप्रदायचे वाशी येथील माजी जिल्हाध्यक्ष विजय भारती, तालुकाध्यक्ष बंडू पवार, सचिव शिवाजी सारुक यांनी तातडीने पिंपळगाव (लिंगी) येथे भेट दिली. स्थानिक कार्यकर्ते पंडित सुकाळे, विलास कोल्हे, सुधीर निरगुडे, त्रिशाला निरगुडे व अनिता जगताप यांच्या सहकार्याने जिल्हा समिती व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी समन्वय साधत देहदानाची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध व सन्मानपूर्वक पार पाडण्यात आली.

या प्रसंगी संप्रदायचे जिल्हाध्यक्ष संतोष केसकर, जिल्हा सचिव कानडे, युवा प्रमुख लक्ष्मी माने यांच्यासह जिल्हा समितीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कै. मनीषा निरगुडे यांचे देहदान समाजासाठी दीपस्तंभ ठरले असून, वैज्ञानिक विचार स्वीकारून मानवतेच्या सेवेसाठी देहदान करण्याचा मोलाचा संदेश त्यांनी समाजाला दिला आहे.

त्यांच्या या धाडसी व प्रेरणादायी निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, वाशी तालुक्यात सामाजिक परिवर्तनाची नवी चळवळ सुरू झाल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त निघालेल्या नगर कीर्तनात अभूतपूर्व उत्साह !




**भा वृतसेवा**
**ांदेड, दि. २४ जानेवारी-**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर ाहिबजी यांच्या ३५० व्या महान शहीदी मागम सोहळ्यानिमित्त आज नांदेड नगरी क्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. 'बोले सो ेहाल... सत श्री अकाल'चा गगनभेदी यघोष, आकाशातून हेलिकॉप्टरद्वारे होणारी ुष्पवृष्टी आणि या सोहळ्यात संत, भाविक, ोकप्रतिनिधी यांच्यासह प्रशासकीय अधिकारी ांचा ओसंडून वाहणारा उत्साह... अशा पवित्र ाणि मंगलमय वातावरणात आज भव्य 'नगर ोर्तन' सोहळा पार पडला.

या ऐतिहासिक नगर कीर्तनाला आज (दि. २४) सकाळी ८ वाजता तखत सचखंड श्री हजूर बचल नगर साहिब जी येथून प्रारंभ झाला. ार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुद्वारामध्ये विधिवत रदास करण्यात आली. यानंतर गुरुद्वाराच्या ट क्रमांक १ जवळ श्री गुरु ग्रंथ साहिबजींची ालखी येताच नांदेड पोलीस दलाच्या वतीने त्र्गीरीव`ष केमी) विधिवत 'मानवंदना' देण्यात ाली. या सोहळ्याचे सर्वात विलोभनीय श्य म्हणजे हेलिकॉप्टरने गुरुद्वारावर केलेली पुष्पवृष्टी.

भव्य नगर कीर्तन मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघ जी, भाई जोतिनदर सिंघ जी, मुख्य ग्रंथी भाई कश्मीर सिंघ जी, भाई रामसिंघ जी, भाई गुरुमीत सिंघ जी या पंच प्यारे साहिबान यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली काढण्यात आले.

सुशोभित आणि भव्य रथामध्ये श्री गुरु ग्रंथ साहिबजी विराजमान होते. या पवित्र पालखीमध्ये भाई कश्मीर सिंघ जी यांनी पवित्र सेवा अत्यंत भक्तीभावाने केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार अशोक चव्हाण, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक आदींसह लोकप्रतिनिधी यांनी विशेष उपस्थिती लावून गुरुचरणी नतमस्तक होत कीर्तनात सहभाग नोंदवला.

तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार (भा.पो.से.) आणि नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकाचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग (से .नि. भाप्रसे), त्यांचे सहकारी जसविंत सिंघ (बॉबी) आणि अधीक्षक हरजितसिंग कडेवाले यांनीही उपस्थित राहून नियोजनात सक्रिय सहभाग घेतला.

या नगर कीर्तनात शीख धर्माची परंपरा आणि महाराष्ट्राची लोकधारा यांचा संगम पाहायला मिळाला. मिरवणुकीच्या अग्रभागी शीख तरुणांची थरारक 'गतका' प्रात्यक्षिके लक्ष वेधून घेत होती, तर हजारो शालेय विद्यार्थिनींनी सादर केलेले 'लेझिम' नृत्य आणि ढोल-ताशांचा गजर वातावरणात उत्साह भरत होता. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी हातात 'मानवता की सच्ची मिसाल' आणि 'हिंद दी चादर' असे फलक घेऊन सामाजिक संदेश दिला.

नगर कीर्तन गुरुद्वारा गेट क्रमांक १ वरून गुरुद्वारा चौक, महावीर चौक, वजिराबाद, तिरंगा चौक, रामसेतू, रवी नगर, नागार्जुन स्कूल मार्गे मुख्य कार्यक्रमस्थळी म्हणजेच 'मोदी मैदान' येथे पोहोचले.

**शालेय विद्यार्थ्यांकडून स्वागत**

गेट क्रमांक १ ते मोदी मैदान या अंदाजे चार किलोमीटरच्या मार्गावर एक अद्भुत दृश्य पाहायला मिळाले. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हजारो शालेय विद्यार्थ्यांनी रांगा लावून शिस्तीत उभे राहत रथाचे भव्य स्वागत केले आणि गुरु ग्रंथ साहिबजींचे दर्शन घेतले. विद्यार्थ्यांनी केलेली फुलांची उधळण आणि त्यांचा उत्साह पाहून उपस्थित भारावून गेले. या संपूर्ण मार्गावर नांदेडकरांनी आपल्या घरांसमोर सडा-रांगोळी काढून नगर कीर्तनाचे जंगी स्वागत केले.

**भक्तीमय वातावरणात श्री गुरुग्रंथ साहिबांचे विधीवत विराजमान**

असर्जन परिसरीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या मुख्य मंडपात आज श्री गुरुग्रंथ साहिबांचे अत्यंत भक्तीमय व मंगल वातावरणात विधीवत विराजमान झाले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा पार पडला.

विराजमान प्रसंगी गुरुबाणीचे मंगल पठण, अरदास व कीर्तन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. गुरुबाणीच्या मधुर स्वरांनी संपूर्ण परिसर आध्यात्मिकतेने भारावून गेला. भाविकांनी सर्व मर्यादांचे पालन करीत शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेत गुरुग्रंथ साहिबांना नमन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने नांदेड शहर व परिसरात उत्साहाचे वातावरण असून, देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन व विविध सामाजिक संघटनांनी आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, स्वच्छता, पाणी व सुरक्षा यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करून धर्म, मानवता व सहिष्णुतेचा संदेश देणारा हा समागम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा नांदेड दौरा



**नांदेड -** केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह हे रविवार, दि. २५ जानेवारी, २०२६ रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. रविवार, दि. २५ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी २ वाजता श्री गुरु गोबिंद सिंघ विमानतळ, नांदेड येथे सीमा सुरक्षा दलाच्या विमानाने त्यांचे आगमन होईल. दुपारी २.०५ वाजता वाहनाने श्री गुरु गोबिंद सिंघ विमानतळ नांदेड येथून प्रयाण. दुपारी २.१५ वाजता तख्त सचखंड गुरुद्वारा श्री हजूर साहिब जी नांदेड येथे आगमन. दुपारी २.१५ ते ३.०० वाजता तख्त सचखंड गुरुद्वारा श्री हुजूर साहिब जी नांदेड येथे धार्मिक कार्यक्रमासाठी राखीव. दुपारी ३.०० वाजता तख्त सचखंड गुरुद्वारा श्री हुजूर साहिब जी नांदेड येथून वाहनाने प्रयाण. दुपारी ३.१० वाजता मोदी मैदान, नांदेड येथे आगमन. दुपारी ३.१० ते ४.३० वाजता श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमासाठी मोदी मैदान नांदेड येथे उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता वाहनाने मोदी मैदान नांदेड येथून प्रयाण. दुपारी ४.४० वाजता श्री गुरु गोबिंद सिंघ विमानतळ नांदेड येथे आगमन. दुपारी ४.४५ वाजता श्री गुरु गोबिंद सिंघ विमानतळ नांदेड येथून सीमा सुरक्षा दलाच्या विमानाने नवी दिल्लीकडे प्रयाण करतील.

## कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

**हाणेगाव** -कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात दि.२४ रोजी भूगोल विभागाकडून आज भूगोल दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. बिरादार उमाकांत सर हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भूगोल विभागाचे प्रा. डॉ. बालाजी राठोड सर, प्रा. डॉ. पलवी कनाडे मडम आणि प्रा. डॉ. रेखा पाटील मडम या होत्या. कार्यक्रमाचे आयोजक भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुर्यकांत कळसकर सर यांनी केले. या



कार्यक्रमाचे आयोजक भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. कळसकर यांनी कार्याक्रमच्या प्रास्ताविकेतून नैसर्गिक घटकाच्या अनेक चमत्कारिक घटकांविषयी माहिती सांगितली तसेच डॉ. सुरेश गरसोळे सर यांनी डॉ. सी. डी. देशपांडे सरांनी भूगोल विषयासाठी केलेल्या गौरवशाली कार्याबद्दल त्यांचा जन्म दिवस १४ जानेवारी हा दिवस भूगोल दिन म्हणून सजरा करण्यची सुरुवात केली. असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले भूगोल विभागाचे प्रा. डॉ. पलवी कनाडे यांनी विद्यार्थ्यांना भूगोल दिनाचे महत्व, नैसर्गिक घटकाचे मानवी जीवनामध्ये महत्व, त्याच बरोबर विद्यार्थांना हसवण्याबारोबरच जीवनाचे एक निश्चित ध्येय ठेवून त्यानुषंगाने विद्यार्थांनी अभ्यास आणि प्रयत्न करावेत असे मार्गदर्शन केले. भूगोल विभागाचे प्रा. डॉ. बालाजी राठोड उपप्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत बिरादार यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन करणारी बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी गीरेवाड वैशाली हिने आतिशय सुंदर आणि उत्कृष्ठ सूत्र संचालन केले. या कार्यक्रमासाठी भूगोल विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते. तर आभार बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी शिंदे मनीषा हिने आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंचशील एकंबेकर यांनी परवानगी दिली होती. संस्थेचे कार्यवाहक प्रा. डॉ. चरणसिंग राठोड सर यांनी हा कार्यक्रम घेण्यासाठी आम्हाला मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री. पवार सर, प्रा. डॉ. साबणे सर, प्रा. डॉ. शिंदे सर, प्रा. डॉ. एमेकर सर, भूगोल विभागाचे प्रा. डॉ. सौ. रेखा पाटील, बंडू पाटील, शंकर राठोड, चव्हाण. एम एस., संतोष सुरेवाड, प्रवीण राठोड, मचकुरी मोसिन यांनी सहकार्य केले.

## किनवटमध्ये कामगारांना साप्ताहिक सुट्टीच नाकारली

**किनवट -** संपूर्ण देश व राज्यात रविवार हा साप्ताहिक सुट्टी अथवा आस्थापना बंदचा दिवस पाळला जात असताना, किनवट शहरातील विविध खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणतीही ठराविक सुट्टी दिली जात नसल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. निजामशाहीच्या काळापासून व १९४६ साली नगर परिषदेच्या स्थापनेपासून अस्तित्वात असलेली शुक्रवारची सुट्टी तसेच केशकर्तनालयांची शनिवार बंदची परंपराही आता मोडीत निघाल्याची खंत व्यक्त होत आहे. शॉप क्ट, किमान वेतन व आरोग्यविषयक कायदे अंमलात आणणारी यंत्रणा मागील १०१२ वर्षांपासून निष्क्रिय असल्याने खाजगी कर्मचाऱ्यांचे शोषण वाढले आहे. यावर तात्काळ उपाययोजना करून साप्ताहिक सुट्टी व कामगार कायद्यांची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिक व कामगारांकडून केली जात आहे.

## मुदखेड येथे वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक




**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ जानेवारी-**

मुदखेड येथील शासकीय विश्रामग्रह येथे वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक संपन्न नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडी उत्तरची नुतन कार्यकारणी जाहीर होताच जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे, जिल्हा महासचिव दिपक मगर,व जिल्हा उपाध्यक्ष के.एच.वने, बालाजी सुर्यतळे, अहंकारे, संघटक वाढवे, आणि सल्लागार प्रा. प्रल्हाद इंगोले यांनी मुदखेड तालुका व शहरातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कायकर्ते यांची आढावा बैठकीचे आयोजन दि. २३ जानेवारी रोजी शासकीय विश्रामग्रह येथे करण्यात आले होते.

या बैठकीत नुतन जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे यांनी सांगीतले आहे कि वंचितच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये जाऊन बुथ बांधनी करून वंचित बहुजन आघाडी पक्षाला मजबुत करून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे हात मजबुत करा.

या आढावा बैठकीचे औचित्य साधुन वंचितचे दादाराव किशनराव चौदंते यांच्या वतीने नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडी उत्तरचे नुतन कार्यकरणी यांचे सत्कार स्वागत करण्यात आले. यावेळी डि.जी. चौदंते, बाबुराव कोलते, राहुल चौदंते, अमोल चौदंते, शिलवंत डोंगरे, रोहन चौदंते, स्वयंदिप कांबळे, विकी गजभारे, रितीक चौदंते, सुभाष दुधंबे, अमोल चौदंते, संतोष चौदंते, यांच्यासह आदि कार्यकर्ते यांची उपस्थीती होती.

## मरवाळी तांड्यातील आश्रम शाळेत जिल्हास्तरीय सांघिक क्रीडा स्पर्धांचा दिमाखदार सोहळा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २४ जानेवारी-**



इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नांदेड यांच्या अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यां साठी आयोजित जिल्हास्तरीय सांघिक क्रीडा स्पर्धा मरवाळी तांडा (ता. नायगाव) येथील माध्यमिक आश्रम शाळेत उत्साहात व यशस्वीपणे पार पडल्या.

दि. २३ जानेवारी रोजी आयोजित या स्पर्धा शाळेचे प्राचार्य विजयकुमार देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या.या स्पर्धांचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन राठोड होते. तर उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे साह्यक संचालक सचिन खुने यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उमेश मोरे (इ.मा.ब.क. वि., नांदेड), गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील,प्रभारी विस्तार अधिकारी उध्दव ढगे, सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती व कै. वसंतराव नाईकांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात प्राचार्य विजयकुमार देशमुख यांनी, विद्यार्थ्यांच्या सुप्त क्रीडागुणांना वाव देण्यासाठी विभागाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या संधीचे सोने करून खेळाडूंनी आपले कौशल्य सिद्ध करावे, असे आवाहन केले. यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत खेळांच्या मैदानाचे उद्घाटन करून स्पर्धांना सुरुवात करण्यात आली.या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध आश्रम शाळांचे सुमारे ६० संघ सहभागी झाले होते. व्हॉलीबॉल,खो-खो व कबड्डी या तीन सांघिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

खो-खो या स्पर्धेत मरवाळी तांडा माध्यमिक आश्रम शाळेतील १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष रतन राठोड, प्राचार्य विजयकुमार देशमुख, संस्थेचे कार्य वाहक डॉ.मधुकर राठोड यांनी संघमार्गदर्शक आनंद राव सूर्यवंशी व सूर्यकांत जाधव तसेच सर्व खेळाडूंचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या क्रीडा स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी मरवाळी तांडा व परिसरातील हजारो खेळाडू व नागरिकांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य विजयकुमार देशमुख यांनी केले.

या यशस्वी आयोजनासाठी माध्यमिक आश्रम शाळेतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजमधील सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माहूर येथे आज निःशुल्क पिरॅमिड ध्यान शिबिर

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २४ जानेवारी-**

पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मुव्हमेंट, ध्यान केंद्र माहूरच्या वतीने निःशुल्क पिरॅमिड ध्यान शिबिराचे आयोजन आज रविवार दि.२५ जानेवारी रोजी स्थानिक बालाजी मंगलम् याठिकाणी दोन सत्रात करण्यात आले आहे.या शिबिराला रिद्धी सिद्धी पिरॅमिड ध्यान केंद्र, नांदुरा येथील वरिष्ठ पिरॅमिड मास्टर सौ. देवयानी नवगजे यांचे प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन लाभणार आहे.

प्रख्यात ध्यानगुरु ब्रम्हर्षी सुभाष पत्रीजींनी स्थापन केलेली महाराष्ट्र पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मूव्हमेंट' (PSSM) ही एक निधर्मी,ना-नफा अध्यात्मिक चळवळ आहे. ज्याचा उद्देश ध्यान, शाकाहार आणि पिरॅमिड ऊर्जेचा प्रचार करणे आहे. पिरॅमिड मेडिटेशन चॅनल (झचउ) द्वारे ज्ञानाचा प्रसार केला गेला. याद्वारे आज जगभरात निःशुल्क ध्यान केंद्र चालविले जात असून, माहूर येथे पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मुव्हमेंट अंतर्गत चालविले जात असलेल्या ध्यान केंद्राच्या वतीने आज रविवारी निःशुल्क पिरॅमिड ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.शिबिराचे प्रथम सत्र सकाळी १० ते ०१ तर दुपारी ०२ ते ०४ वाजेपर्यंत द्वितीय सत्र असणार आहे. दोन्ही सत्राच्या मधल्या वेळेत दुपारी ०१ ते ०२ दरम्यान उपस्थितांसाठी अन्नप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

पिरॅमिड ध्यान शिबिर हे पिरॅमिडच्या रचनेखाली किंवा आत बसून 'आनापानसती' (श्वासावर लक्ष केंद्रित करणे) ध्यान करण्याची एक विशेष पद्धत आहे. यात पिरामिडच्या आकाराच्या विशेष रचनांमुळे वैश्विक ऊर्जा केंद्रित होते, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास,मन शांत होण्यास आणि गहन ध्यानावस्थेत लवकर जाण्यास मदत होते. पिरॅमिडच्या आकारामुळे सभोवतालची सकारात्मक ऊर्जा एका ठिकाणी केंद्रित होते, जी सामान्य ध्यानाच्या तुलनेत तिप्पट ऊर्जा प्रदान करते.या शिबिरात कोणतेही मंत्र किंवा देवतांची पूजा न करता, केवळ नैसर्गिक श्वासाचे निरीक्षण केले जाते.

या पिरॅमिड ध्यान शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक गोपाल तिवारी,भारत बेहेरे, जितेंद्र भारती, डॉ. राम कदम, शोभाताई महामुने,नारायण मडपेल्लीवार,प्रमोद राठोड,बळीराम परसवाळे, विनायक कान्नव,रामराव राठोड,गमे पाटील, राजाराम पस्पुलवार,उमेश जाधव,संतोष सावळकर, विश्वजित जाधव, विजय तिवसकर,अवधुत लांडे, विजिगिरी दिनेश गंगाराम,संजय आराध्ये,राजु जाधव,सुनिल वाघमारे,सुनिल गजांकुशकर,दिप भलगे, शैलेश कदम यांनी केले आहे.



**नांदेड -पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांचे आज नांदेड येथील गुरु गोविंद सिंघ जी विमानतळावर आगमन झाले. आगमन प्रसंगी त्यांचे स्वागत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. मुख्यमंत्री भगवंत मान हे विमानतळ येथून गुरुद्वारा व मोदी मैदान येथे आयोजित हिंद दी चादर श्री.गुरु तेग बहादुर साहीब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी रवाना झाले.**

## देगलूर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन ; त्रिसीमेवरची संस्कृती एकाच रंगमंचावर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २४ जानेवारी-**




महाराष्ट्रतेलंगणाकर्नाटक या तीन राज्यांच्या त्रिसीमेवर वसलेले देगलूर शहर म्हणजे जणू 'मिनी इंडिया'च जणू दर्शन होय. विविध भाषा, संस्कृती आणि परंपरांचा संगम असलेल्या या शहरातील देगलूर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने यंदा बहुभाषिकतेचा आगळा-वेगळा ठसा उमटवला आहे. शहरातील सर्वात जुने महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या रंगमंचावर यावेळी केवळ कार्यक्रम नव्हे, तर संस्कृतींचा संवाद घडून आला आहे.

या स्नेहसंमेलनात मराठी, तेलुगु, कन्नड, हिंदी, उर्दू, दख्खनी, इंग्रजी, बांग्ला, गुजराती, बंजारा, राजस्थानी, संस्कृत, हैदराबादी अशा अनेक भाषांतून गीतगायन, नृत्य, भाषण आणि नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात इतक्या भाषांचा सुरेल संगम क्वचितच पाहायला मिळतो. विशेष म्हणजे मुंबई-पुण्यासारख्या महानगरांतही जिथे बहुभाषिक कार्यक्रम दुर्मिळ ठरतात, तिथे देगलूरसारख्या सीमावर्ती शहरात हा सांस्कृतिक मेळा साकारला गेला आहे. प्रत्येक सादरीकरणात त्या-त्या भाषेची अस्मिता, लोकपरंपरा आणि भावविश्व जपले गेले. कधी बंजारा नृत्यातील ठेका रंगमंच हलवून गेला, तर कधी संस्कृत श्लोकांच्या उच्चारांनी वातावरण भारावून टाकले. उर्दू-दख्खनीच्या अदबी शब्दसौंदर्याला हिंदी-मराठी गीतांनी सुरेल साथ दिली. हिंदी, इंग्रजी व रिमीक्स गाण्यांच्या सादरीकरणांनी आधुनिकतेची झलक दाखवली, तर राजस्थानी, गुजराती, बांग्ला, मराठमोळी लावणी लोकनृत्यांनी परंपरेची मुळे अधोरेखित केली.

या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांनी केवळ कलागुणांचा आविष्काराचे केवळ सादरीकरण केला नाही, तर भाषा वेगळी, संस्कृती वेगळी; तरीही मन एकच हा संदेश ठळकपणे दिला. देगलूरच्या बहुभाषिक-बहुसांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी नव्या पिढीने आनंदाने स्वीकारल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले. देशभरात सांस्कृतिक एकात्मतेच्या चर्चा सुरू असताना, देगलूर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाने प्रत्यक्ष कृतीतून एकोप्याचा आदर्श घालून दिला. सीमारेषा जिथे संपतात, तिथे संस्कृतींचा संगम सुरू होतो. हेच देगलूर येथील देगलूर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनातून पुन्हा एकदा सिद्ध झाले.